
# आनंदलहरी



# आनंदलहरी

श्री दत्तमहाराज कवीश्वर

यांची

प्रवचने

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशन दिवस
रविवार, दि. २९ जुलै, २००७
गुरूपौर्णिमा, शके १९२९.

मुखपृष्ठ
आमोद दामले

मुद्रक
रमा एन्टरप्राईझेस
३९, स्वामी समर्थ नगर,
बंडू गोखले पथ, गिरगांव, मुंबई ४०० ०४.
दूरध्वनी: २३८५२८४६
भ्रमणध्वनी: ९३२३२९१०३४

प्रकाशक
श्री भगवती प्रकाशन
६/१, साईविहार, कर्वेनगर, पुणे-५२.

## श्रीदत्तमहात्म्य-जालना-होळी पौर्णिमा - १६.३.१९९५

भगवान दत्तात्रेयांचा अवतार सत्ययुगामध्ये झाला. अनुसूया माता आणि अत्रि महर्षी यांची निष्ठा, भक्ती आणि कर्माचरण पाहून प्रसन्न होऊन भगवान महाविष्णूंनी दत्तात्रेय रुप धारण केलं. दत्तात्रेय रुपामध्ये सर्वही त्यांचे भक्त आहेत. देव आहेत,गंधर्व आहेत, मानव आहेत. कार्तवीर्यार्जुन हा एक मोठा महाभक्त होऊन गेला दत्तात्रेयांचा. दत्तात्रेयांनी सर्व योग सिद्धी त्याला दिली. त्याचा पिता कृतवीर्य, गेल्यानंतर कार्तवीर्यार्जुनाने राज्यावर बसावं म्हणून सर्व मंडळी, प्रधान मंडळींनी त्याचे मन वळवण्याचे प्रयत्न केले. पण कार्तवीर्याने सांगितलं, ''मला राज्य करायचं नाही. कारण राज्य म्हणजे सगळं पाप आहे. अपराधी माणसालाही सोडावं लागतं, निरपराधी माणसालाही दंड करावा लागतो.चार चक्षु राजाला म्हणतात. चार म्हणजे हेर. हेर त्याचे चक्षु आहेत. त्याला ते डोळ्यांनी पहाता येत नाही काही नाही. हे हेर जे सांगतील त्याप्रमाणे खरं मानून राज्य करावं लागतं. म्हणून अन्याय होईल. तेव्हा मी राज्य करणार नाही.'' त्यानं कारण सांगितलं ते बरोबर आहे. पण आता सगळं राजाला समजणार कसं? ऋषीमंडळी त्याला म्हणाली, ''राज्यात घडणाऱ्या सर्व हालचाली तुला कळायला पाहिजे अशी तुझी इच्छा आहे. त्याशिवाय राज्य तुला करायचं नाही. तेव्हा भगवान दत्तात्रेयांना तू शरण जा म्हणजे त्यांच्या कृपेने तुला सिद्धी प्राप्त होईल.'' त्याप्रमाणे राजाने दत्तात्रेयांकडे जाऊन त्यांची सेवा केली आणि दत्तात्रेयांनी त्याला सर्व ज्ञान दिलेलं आहे. तेव्हा सर्वही ज्ञान त्याला व्हावं अशी त्याची बुद्धी दत्तात्रेयांनी तयार केली. ''आता राज्य कर. सर्व तुला कळेल. त्याचप्रमाणे तू स्वत: जाणून

आणखी त्याप्रमाणे राज्य करशील.'' म्हणाले. ही व्यवस्था करुन दिली आणि मग कार्तवीर्यार्जुनानी राज्याला सुरूवात केली. कुणीही राज्य हातामध्ये घ्यायचं नाही. म्हणून त्यांनी नियम केले. कालीदासांनी त्याचं वर्णन केलेलं आहे. कुठे चोरी करायची, कुणाचा नाश करायचा असा दुर्जन मंडळींचा अकार्याचा नुसता विचार सुरु झाला की त्या ठिकाणी कार्तवीर्यार्जुन धनुष्यबाण घेऊन हजर असायचा. ही सिद्धी त्याला दिली होती.

वेदव्यासांनी संजयला, ''तुला सर्व युद्ध पहाता येईल ते पाहून तू धृतराष्ट्राला सांग.'' असे सांगून ती सिद्धी त्याला दिली होती. त्याप्रमाणे संजय सर्व पहात होता.भगवद् गीतेचा उपदेश संजयलाही ऐकायला मिळाला.

त्याप्रमाणे कार्तवीर्यार्जुन कुठे अकार्याचा विचार चालू झाला की त्या ठिकाणी हजर होत आहे. अनेक ठिकाणी दुर्जन मंडळी असायची पण तितकं रूप धारण करणं त्या ठिकाणी लगेच जाऊन पोहोचणं ही विलक्षण सिद्धी आहे. ज्ञान आणि क्रिया दोन्हीही आहे. त्यामुळे लोकांमध्ये भीती निर्माण झाली. हा राजा म्हणाले स्वत: येतो. देवावर अवलंबून नाही. स्वत: सगळं याला कळतं. त्यामुळे मनामध्येसुद्धा आपण दुर्विचार आणणं बरोबर नाही. अशी आणखी भावना सगळ्यांची झाली. याप्रमाणे लोकांच्या मनामध्ये भीती निर्माण करून आणखी दुर्वर्तनापासून त्यांना बाजूला करण्याचा प्रयत्न कार्तवीर्यार्जुन आपल्या राज्यकारभारामध्ये एकटा करत होता. रावणाला सुद्धा त्याची भीती होती.

असं राज्य त्यानी ८० हजार वर्षपर्यंत केलं म्हणतात. परंतु

लोकांची वाईट प्रवृत्ती तेवढ्यापुरती बाजूला व्हायची. कार्तवीर्यार्जुन येईल आपल्याला शिक्षा करेल. या भीतीमुळे लोक बाजूला व्हायचे. नैसर्गिक जी प्रवृत्ती आहे मनाची, वाईट संस्कार जे आहेत हे त्या बुद्धीला झालेले आहेत. इतकी बुद्धी सुधारणं फार कठीण आहे. शेवटी कार्तवीर्यार्जुनाला सुद्धा ते नको वाटलं. कंटाळला. किती दिवस करायचं, म्हणाला. पुन्हा दत्तात्रेयांच्याकडे शरण गेला तो. ते सुरवातीला कांही बोलले नाहीत. एक दिवस झाला. दोन दिवस झाले.काही नाही. भाषण नाही. ऋषी मंडळी म्हणाली ''महाराज आपला प्रिय भक्त आलेला आहे. आपण भाषणही केलं नाही.'' ते म्हणाले, '' त्याला आणखी सिद्धी पाहीजे असेल तर मागून घे आणि जा इथं थांबू नकोस,'' राजा हात जोडून म्हणाला, ''महाराज मला दिलेली सिद्धी आपण परत घ्या हे सांगण्याकरता मी आलेलो आहे. नको मला हे ज्ञान. लोकांना शिक्षा करणं नको आणि त्याचा काही उपयोगही होत नाही.'' मग दत्तात्रेयांनी त्याला योगाचा उपदेश केला, ज्ञान सांगितलं. आत्मानात्म विचार सगळा त्याला समजून सांगितला. वैराग्य निर्माण झालं ना. त्यामुळे तो अधिकारी झाला आणि असा कार्तवीर्यार्जुनाचा उद्धार भगवान दत्तात्रेयांनी केला. मोठा शिष्य तो स्वत: होत असताना काय होत असेल कुणाला ठाऊक. पण आज त्या कार्तवीर्यार्जुनाचं नामस्मरण केलं. काही मंत्रोच्चारण केलं तरी सुद्धा आपली इच्छा पूर्ण होते. 'गतं नष्टं च लभ्यते' म्हणतात. इतकी शक्ती ही त्यांच्यामध्ये भगवान दत्तात्रेयांच्या कृपेनं कायम आहे.

यदुराजाही तसाच झाला. दु:खी झाला होता बिचारा. ययाती राजा त्याचा पिता. ययाती राजाला शुक्राचार्यांनी शाप दिल्यामुळे

वृद्धापकाळ प्राप्त झाला. शुक्राचार्यांना शरण गेला म्हणाला,''माझ्या विषयवासना अद्यापि आहेत आणि मी तर वृद्ध झालो.'' तेव्हा शुक्राचार्य म्हणाले, ''जर तुझ्या मुलांपैकी कोणी जर आपलं तारुण्य तुला देत असेल तर ते तारुण्य तू घे आणि तुझे ते वृद्धत्व त्यांना दे.'' केवढी विलक्षण संकल्प सिद्धी त्या तपस्वी पुरूषांची. त्यामुळे त्यांच्यातपावर विश्वास असणारे जे लोक आहेत ते पित्याची कोणतीही आज्ञा झाली तरी मान्य करीत.

रेणुका माता द्वारामध्ये उभी आहे. आत यायचं नाही. आज्ञा झाली. तिच्या मुलांना सांगितलं, ''हिला मारून टाका.'' मुलं कशी मारतील आईला? इतक्यात वनातून आणखी परशुराम आलेले आहेत. ''हे तुझे भाऊ आणि तुझी आई या सगळ्यांचा शिरच्छेद कर '' म्हणाले. काही विचार नाही. परशु बाहेर काढला, सगळ्यांचा शिरच्छेद केला.जमदग्नी महर्षी संतुष्ट झाले. ''काय पाहिजे तो वर मागून घे'' म्हणाले.म्हणाले. परशुरामांनी सांगितलं, ''हे सगळे जिवंत व्हावेत आणि ह्यांना मी मारलेलं आहे असं स्मरण राहू नये.'' जमदग्नींनी तो वर दिला आणि सगळे जिवंत झाले. आपल्या पित्याच्या तपाचं काय सामर्थ्य आहे हे जाणणारे परशुराम होते. 'आईला मार' मारून टाकलं. पाप पुण्याचा विचार नाही. जिवंत ही केलंय.

देवयानीची माता मृत झाल्यामुळे देवयानीवरती फार प्रेम शुक्राचार्यांचं होतं. मेलेल्या दैत्यांना जिवंत करणारे शुक्राचार्य इतका संजीवनी मंत्र त्यांच्याजवळ असताना देवयानीची माता मेल्यानंतर त्यांनी तिला जिवंत का केलं नाही हे एक कोडंच आहे. महामृत्यू आला होता म्हणा. काय झालं कुणास ठाऊक. त्यामुळे देवयानीवरती

त्यांची माया होती. माता नाही बिचारीला तिचा मुलगा यदु. ययातीने त्याला विचारलं, ''माझं म्हातारपण काही दिवस सांभाळशील का? तुझं तारुण्य मला दे.'' तो म्हणाला 'पिताजी म्हाताऱ्याला पाहूनच आम्ही घाबरतो. मी काही घेणार नाही म्हातारपण.' दुसऱ्या मुलाला विचारले त्यानेही नकार दिला, सर्वात कनिष्ठ पुरू म्हणून मुलगा होता. तो म्हणाला, '' मी तुमचं वृद्धत्व घेतो. माझं तारुण्य तुम्ही घ्या, राज्य करा.'' म्हणजे शाप जरी दिला तरी ही अदलाबदल करण्याची संकल्पशक्ती त्या ऋषींनी राजाला दिली. पुढे ययातीने पुष्कळ वर्ष राज्य केलं आणि नंतर ययाती वनामध्ये निघालेला असताना त्याने विचार केला आपल्याला उपयोगी पडलेला जो सर्वात धाकटा मुलगा आहे त्यालाच राज्य द्यायला पाहीजे. हा पितृभक्त आहे. हा राज्याचा अधिकारी होईल म्हणून त्याच्या ताब्यामध्ये राज्य दिलं आणि बाकीच्या बंधुंना त्याच्या आज्ञेत राहाण्यास सांगितले. तुम्हाला राज्याचा अधिकार नाही, म्हणून सांगून ययाती वनात गेला. त्यामुळे यदु राजाला दुःख झालं तो अधिकारी असताना त्याला राज्य मिळालं नाही ना. यदूही रानांत निघून गेला. वनामध्ये फिरता फिरता भगवान दत्तात्रेय अवधूत वेषामध्ये एका झाडाखाली बसलेले त्याला दिसले. पूर्ण शक्ती आहे. सर्व शक्ती आहे.कार्तवीर्यार्जुनासारखे भक्त आणखी ज्यांनी निर्माण केले. पण त्या शक्तीची आणखी आठवणही नाहीये. स्वस्थ पडून आहेत. यदु राजाला त्यांच्या समोर गेल्याबरोबर आनंद वाटला. नमस्कार केला. आणखी विचारलं, '' महाराज काय इथं तुम्ही झाडाखाली पडून राहिलात. तुमच्याजवळ पात्र नाही. काही सामग्री नाही. जेवण्याखाण्याची व्यवस्था काय?

पैसा नाही. पैसा असेल तर काही खाण्यापिण्याचे पदार्थ आणता येतील. तुमच्याजवळ काही सामग्री नसताना इतका आनंद कसा मिळाला?'' हा प्रश्न आहे यदुराजाचा.

संपूर्ण सामग्री आपल्याजवळ असती ती सुद्धा कमी पडत आहे. आम्हाला कितीही संग्रह केला तरी अजून पाहिजे आहे. आपल्याला पुरलं पाहिजे. आपल्यामुलाबाळांना, नातवंडाना आणखी मंडळींना, तृप्ती नाही. लोभ वाढतो आहे. त्यामुळे संपूर्ण एकंदर संग्रह करावा लागतोय.

यदुराजानी विचारलं, ''महाराज काहीही आपल्याजवळ धन वगैरे नाही. धनाकरीता आपण प्रयत्नही करत नाही. आणि इतका आनंद मिळाला कसा? आपल्या खाण्यापिण्याची व्यवस्था कोण करतो?'' अवधूत यदुराजाला म्हणाले, ''सुख म्हणजे आत्मरुप आहे. आत्मा हा आनंदरुप आहे. स्वत:च्या स्वरूपाचा जो आनंद आहे त्याच्याकरता आणखी प्रयत्न करायचा. बाहेरच्या धनासारख्या साधनांनी जे सुख मिळालं ते सगळं आणखी नश्वर आहे. धन संपलं की ते सुख संपलं.'' असा त्याला पुष्कळ उपदेश केला. आणखी आपली वृत्ती कशी आहे तीही त्याला सांगितली. म्हणाले,''मी काहीही इच्छा करत नाही. इच्छा करून प्रयत्न करणारे सर्वही व्यवहार करणारे, सगळे लोक, सर्व जीव हे दु:खामध्ये सापडलेले आहेत. पूर्ण सुख त्यांना मिळत नाही. म्हणून मी काहीही करायचं नाही ठरवलेलं आहे.'' झालं, गुणातीत अवस्था आहे ती.पूर्ण ज्ञान संपन्न आहेत भगवान. हे ज्ञान कसं मिळेल? त्याच्याकरता चोवीस गुरुंची कथा सांगितली. म्हणाले,''मी चोवीस गुरू केले ज्ञान मिळवण्याकरता. गुण कोणचा

आणि दोष कोणचा हे दोन्ही समजलं पाहीजे. दोष टाकायचे कसे हे समजलं पाहीजे आणि गुण कसे घ्यायचे हे समजलं पाहीजे. त्याकरता हे सगळे गुरू मी केलेले आहेत. हेयोपादेय विवेक ज्याला म्हणतात. हेय म्हणजे काय? उपादेय काय? टाकायचं काय? घ्यायचं काय? हे समजतच नाही आपल्याला. जगामधे लोक जसं वागतील तसं ते बरं आहे ते करावं, तसं करावं तसं मिळवावं असं वाटतं. आपल्यामनाचा पूर्ण निश्चय काहीच होत नाही. तो विवेक एक पक्का झाला पाहीजे.'' तो विवेक पक्का होण्याकरता म्हणून चोवीस गुरुंची कथा त्यांनी सांगितली.

पृथ्वी, जल, पंचमहाभूतं हे गुरूच आहेत. पंचमहाभूतांमध्ये काय काय गुण आहेत ते सांगितलेलं आहे. आणि ह्या गुणग्राहक बुद्धीचे नाथ महाराजांनी वर्णन केलेले आह.

जो जयाचा घेतला गुण। तो ही गुरू जाण।

आणि अशी एकदा बुद्धी आपल्यात निर्माण झाली म्हणजे काही घरदार, संसार वगैरे सोडून जाण्याचं काही कारण नाही म्हणाले. ज्यांचे गुण असतील ते घ्यायचे. दोष असतील ते सोडून द्यायचे. उपेक्षा करायची. यदुराजाला हा उपदेश केला आणि त्यालाही कृतार्थ केलं.

अलर्क हाही मोठा राजा, मदालसेचा मुलगा आहे. मदालसा आणखी ब्रह्मज्ञानी स्त्री होती. अनेक जन्मांची तिची तपश्चर्या होती. त्यामुळं ईश्वरकृपा, सद्गुरूंची कृपा होऊन पूर्ण ज्ञान संपन्न झालेली मदालसा. तिला पहिला मुलगा झाला. राजानी त्याचं नाव सुबाहू ठेवलं. ती हसली. दुसरा मुलगा झाला त्याचंही असंच काहीसं विक्रांत

वगैरे ठेवलं असेल. दत्तमाहात्म्यामध्ये या सगळ्या कथा आलेल्या आहेत. आणि सगळ्या त्या तिन्ही मुलांना मदालसेनं उपदेश केलेला आहे. लहानपणामध्ये कळत नाही हे सामान्य लोकांचं आपल्यासारखे लोक प्रारब्धाधीन असलेले, त्यांना कळत नाही. संजयच्या द्वाराने गीता ऐकली धृतराष्ट्राने पण त्याच्या मनावर काहीही परिणाम झाला नाही. तशीच स्थिती आहे. मदालसा अधिकारी आहे. आणि ती तीनही मुले पूर्वसंस्काराने अधिकारी झाली होती. पाळण्यामध्ये निजलेली असताना मदालसेने केलेल्या उपदेशाने ती मुले ज्ञानी झालेली आहेत. पूर्ण ज्ञान. शरीराचा काही संबंध नाहीए. कुठं पडले काय, अंगाला माती लागली काही लक्ष नाही. खाण्यापिण्याची शुद्ध नाही.

राजाची आणखी वृत्ती वेगळी आहे. मदालसेची योग्यता त्याला माहीती नाही. राजाने विचारलं, ''बाई तू असं काय शिकवलंस मुलांना? वेदान्त वाक्याप्रमाणे आणखी आत्मज्ञान झालेला महात्मा तो व्यवहाराला अनुसरुनच वागेल असं नाही. व्यवहार त्याच्या लक्षात असेल तर बरं आहे. व्यवहाराकडे काही लक्षच नाही ना . लोक व्यवहाराच्या विरूद्ध ही मुलं, त्यांना काय शिकवलंस तूं?'' चौथा मुलगा झाला. त्याचं नाव अलर्क असं ठेवलं.आणि मदालसेला सांगितले, ''याला मात्र तू अशा प्रकारचं शिक्षण देऊ नकोस. चांगला व्यवहारी राजा झाला पाहीजे हा.'' पतीची आज्ञा आहे आणि त्याचं नशीब आहे. त्याला ब्रह्मज्ञानी होण्याला आणखी बराच काळ आहे. आत्ता ज्ञान मिळणार नाही, आई जरी असली तरी राजाने आणखी सगळं सांगून शिकवलं आहे. अलर्काच्या स्वाधीन राज्य करून आणखी

मातापिता निघून गेलेले आहेत. जाता जाता मदालसेनं एक पेटी केली होती. त्या पेटीत एक कागद लिहून ठेवला होता. हातात बांधत जा म्हणाली. आणि तुझ्यावर काही संकट ज्यावेळेला येईल त्यावेळेला हे उघडून पहा म्हणजे तुला मार्गदर्शन होईल. मार्गदर्शन करणारे गुरु प्रत्यक्ष जवळच हवेत असं नाही. ती वेळ आली की त्याप्रमाणे होऊन जातं. बरीच वर्ष अलर्कानं राज्य केलं.

त्याचा बंधू सुबाहू. त्याला वाटलं आपण सगळे मुक्त झालो. आणि एकटाच आपला भाऊ हा असा राहीला. यालाही बाहेर काढलं पाहीजे. म्हणून त्याने आणखी त्याला निरोप पाठवला.''तू काही एकटा राजा नाहीस. आम्हीही अधिकारी आहोत. आम्हाला राज्य दिलं पाहीजेस तूं'' आता ज्या अलर्काच्या इतके दिवस राज्य ताब्यामध्ये आहे तो कसा देईल? लढाई झाली. त्या सुबाहूने आणखी त्याला जिंकलं. सगळ्या सैनिकांना सांगून ठेवलं. हा जर कुठं बाहेर जात असला तर सोडून द्या. धरू नका याला.

पराजय झाल्यामुळे दुःखी झालेला अलर्क नगराच्या बाहेर पडलेला आहे. वनामध्ये काही ऋषीमंडळींची भेट झालेली आहे. त्यांनी सांगितलं, ''राजा, भगवान दत्तात्रेयांना तू शरण जा. म्हणजे तुझं दुःख जाईल. ब्रह्मज्ञानी मातेचा मुलगा तू आहेस.'' त्याचा सामान्य नाही अधिकार. मोठा अधिकारी. पण वेळ आली नव्हती. आतापर्यंत राज्यामध्येच सगळी आसक्ती, त्यातच गेला सगळा काळ. दत्तात्रेयांच्या जवळ शरण आलेला आहे.''महाराज माझं दुःख दूर करा. मी दुःखी आहे. '' अधिकारी ज्ञानी महात्म्यांच्या शब्दामध्येही सामर्थ्य आहे.''

दत्तात्रेयांनी विचारले, ''तू दुःखी आहे. तू म्हणजे कोण दुःखी

आहे. सांग बाबा '' झालं. प्रश्नाबरोबरच त्याला ज्ञान मिळालं. मी म्हणजे कोण? देह म्हणजे मी इंद्रिय, प्राणमय कोष, मनोमय कोष, आनंदमय कोष, ज्ञानमय कोष, सगळे कोष बाजूला केले खरा 'मी' सापडलां त्याला आणि तो तर आनंदरूप आहे. मी दु:खी आहे म्हणून माझं दु:ख दूर करा. शरण आलेला अलर्क दु:ख नाहीच म्हणाला. मला दु:ख नाही.

यापूर्वी प्रारब्धाचाप्रतिबंध असल्यामुळे ब्रह्मज्ञानी माताही पतीच्या आज्ञेमुळे त्याला सुधारु शकली नाही.भगवान दत्तात्रेयांनी झालेले ज्ञान दृढ होण्याकरता त्याला सर्वही तत्वज्ञान सांगितलं. असे अनेक भक्त झालेले आहेत भगवान दत्तात्रेयांचे. त्यांनीच आणखी श्रीपादश्रीवल्लभ आणि नृसिंह सरस्वती हे दोन अवतार कलियुगात धारण केले. गाणगापुरमध्ये, नरसोबाच्या वाडीमध्ये त्यांचं स्थान आहे पादुका.

पुष्कळ मंडळी आर्त आहेत. जिज्ञासू आहेत. अर्थार्थी आहेत, ज्ञानी आहेत. सर्व प्रकारची मंडळी त्या त्या स्थानामध्ये जात आहेत आणि दत्तात्रेयांच्या कृपेनं पूर्ण मुक्त होतात. नारायण स्वामी महाराज दोनशे वर्ष झाली असतील साधारण. शब्दज्ञान पूर्ण आहे. शास्त्र सगळं समजलेलं आहे. उत्तम प्रारब्ध. गुरुंच्या सांगण्याप्रमाणे नरसोबाच्या वाडीमध्ये येऊन राहिलेले आहेत. आणि दत्तात्रेयांनी त्यांना संन्यास दीक्षा दिली. उपदेश केला आणि भगवंतांचं ध्यान स्मरण करीत अखंड त्याचं काल शेवटपर्यंत नरसोबाच्या वाडीमध्ये गेलेला आहे. असे ज्ञानी भक्तही आहेत. अद्यापि पादुका स्थान आहे. परंतु पादुका हे परमेश्वराचं स्वरुप आहे ही भावना मात्र आम्ही पहात

असताना आमच्या मनामध्ये निर्माण होत नाहीत. त्यामुळे एक मूर्ती आहे, पादुका म्हणून आहे त्याला देव कसं समजायचं? देवत्वाची भावना झाली पाहिजे. ती भावना झालेले जरी त्या ठिकाणापासून दूर राहिले तरी त्यांना अद्यापिसुद्धा पुष्कळ अनुभव येतायत. जी जी इच्छा असेल, सांसारिक काही अडचणी असतील त्याही दूर होतात.संकटे दूर होतात.जिज्ञासा आहे. कोणीतरी योग्य भेटला पाहीजे. आणि सद्गुरुंची भेटही त्याला होत आहे. तोही कृतार्थ होतो आहे. पाचशे वर्षे होऊन गेली अद्यापि त्या स्थानामध्ये अनेक भक्तांची कार्य चालू आहेत.

दत्तात्रेय अवतार तर आहेच आहे. मूळ त्या दत्तात्रेयांचा सर्वत्र संचार होतो असे सांगतात. सकाळी उठल्यापासून संध्याकाळपर्यंत सर्वही भारतामध्ये फिरून येतात. सद्गुरू वासुदेवानंदसरस्वती महाराजांनी एका स्तोत्रामध्ये त्यांची दिनचर्या लिहीलेली आहे. काशीमध्ये स्नान करायचं, संध्येला कऱ्हाडला यायचं, भिक्षा कोल्हापूरमध्ये मागायची, आणि पांचाळेश्वरला गोदावरीच्या तीरावर येऊन भोजन करायचं. कार्तवीर्यार्जु सर्व ठिकाणी जसा फिरत होता ना त्याप्रमाणे दत्तात्रेयही सर्वत्र संचार करतात. काय विमानात बसून तरी असा संचार करता येईल का? जे संसारी भक्त असतील त्यांचीही इच्छा पूर्ण करावी, विरक्त असेल तर त्यालाही आणखी ज्ञान करायचं. सगळी कार्य स्वत: पाहून करतायत. त्यामुळे या अवतारामध्ये सगळीही मंडळी देव दैत्य हे सगळे त्यांचे शिष्य आहेत. आणि हा अवतार अखंड रहाणार आहे. यांना गरु कोणी नाही हे विशेष आहे.

रामचंद्राला वसिष्ठ गुरु होते. श्रीकृष्णांना सांदीपनी होते.दत्तात्रेय

सगळ्यांचे गुरु आहेत. स्वत: त्यांना गुरू नाही. सर्व ज्ञान पूर्ण आहे. स्मर्तृगामी त्यांना म्हणतात. स्मरण केल्याबरोबर येणारे, काही वेळ नाही.काही दिरंगाई नाही आहे. म्हणजे दया आहे. भक्तांच्या बद्दल. तेव्हा या दृष्टीनं दत्तात्रेयांचं महात्म्य सद्‌गुरू वासुदेवानंद सरस्वती महाराजांनी मुद्दाम मराठीमध्ये ओवीबद्ध लिहिलेलं आहे. दत्तपुराणामध्ये त्या कथा आलेल्या आहेत. पण भक्तीयोग म्हणजे कसा आहे ते समजून सांगण्याकरता हे (श्रीदत्तमहात्म्य) सबंध आणखी एकावन्न अध्यायांचं हे चरित्र आहे. केवळ दत्तात्रेयांचे. त्यात श्रीपादश्रीवल्लभ, नृसिंह सरस्वती या अवताराचं काही वर्णन नाहीये. पुढं आलेलं आहे. तेव्हा अशा दृष्टीने कलियुगामध्ये आणखी भगवान दत्तात्रेयांचे स्थान, त्याचं मार्गदर्शनही आणखी पुष्कळ लोक मिळवत आहेत. उपासना करताहेत. आणि त्या उपासनेमुळे जन्ममरणाच्या आणखी प्रवाहातून त्यांना मुक्त होता येईल. असं हे दत्तात्रेयांच्या प्रसादाकरता या ठिकाणी मुक्तहस्ते दत्तयागही पार पडलेला आहे. ताई महाराजांच्या इच्छेने त्यांच्याच मार्गदर्शनाने उत्तम प्रकाराने याग पार पडलेला आहे. ईश्वराचं स्मरण करून आणखी त्याची पूर्णता असती आहे. शेवटी परमेश्वराचं स्मरण करून कर्मसांग होत असतं. तेव्हां अशा प्रकारचं कार्य चाललेलं आहे. बुद्धीही त्यांनीच द्यायची आणि बुद्धीप्रमाणे सुरू केलेलं कार्यही पूर्ण करायचं. ही दोन्ही शक्ती आहे. बुद्धीला प्रेरणा करणं ही ईश्वराची शक्ती. सर्व ठिकाणी दत्तयाग होत नाहीत. अनेक प्रकारची आणखी कितीतरी कार्य चालू आहेत, प्रपंचामध्ये. पण ईश्वराचं अस्तित्वं मान्य करणारी मंडळी ही जी भक्तमंडळी आहेत त्यांच्या मनामध्ये प्रेरणा होऊन आणखी हे अशा प्रकारचं कार्य अल्प का होईना पण चालू

आहे. आणि त्यामुळे आणखी सर्वांचं कल्याण होणार आहे. ईश्वरकृपा ही मुख्य आहे. आणि त्या परमात्म्याने अनेक अवतार धारण केलेले आहेत. ते दत्तात्रेय अदृश्य रुपाने का होईना आहेत.श्रीपादश्रीवल्लभ, नृसिंहसरस्वती अदृश्य झाले. कांही काळ ते प्रगट राहिले.परंतु अदृश्य आहेत म्हणजे आमच्या डोळ्यांना दिसत नाहीत. पहाण्याची योग्यता आमची नाहीये. ती योग्यता मिळवण्याकरता अद्यापि कांही तरी प्रयत्न केला पाहीजे असे दिसून येतं. दिसत नाही म्हणून नाहीच असं म्हणायचं नाही. नास्तिकता जर उत्पन्न झाली तर त्याच्यासारखं दुसरं पाप कोणतं नाही. ती नास्तिकता आपल्या बुद्धीमध्ये उत्पन्न होऊ नये. आमची ती योग्यता नाही म्हणून ते आम्हाला दिसत नाही. परमात्मसाक्षात्कार प्रत्यक्ष ज्यांना झालेले आहेत अशा प्रकारच्या महात्म्यांची चरित्र प्रसिद्ध आहेत. त्यांनी ईश्वराला पाहिले आणि आम्हाला पहाता येत नाही म्हणजे आमच्याजवळ काहीतरी कमीपणा आहे. दोष आहेत. तो दोष दूर करण्याकरता आपण प्रयत्न केला पाहिजे. म्हणजे ईश्वराचा साक्षात्कार होईल. ही भावना मनामध्ये राहून आणखी उपासना अखंड झाली तर त्या उपासनेचं फळ अनुभवाला आल्यावाचून रहात नाही.

तेव्हां आज या ठिकाणी काही थोडीशी सेवा झाली. देवालाच इथं बोलावल्यासारखं झालं. या प्रमाणे थोडसं गुणचिंतन गुणानुवाद ज्याला म्हणतात. नामस्मरण आणखी गुणस्मरण.अनंत गुण भगवंताचे आहेत. अनंत शक्ती आहे. तर अशा रीतीनं अशीच भक्ती आपल्या मनामध्ये परमेश्वराच्या कृपेनं निर्माण व्हावी. दृढ व्हावी आणि त्याचं फल म्हणजे भगवंताचा साक्षात्कार ज्याला म्हणतात याच नेत्रांनाही

होऊ शकतो. किंवा नवीन दृष्टीही भगवान देत आहेत. अर्जुनाला दिव्य दृष्टी दिली. तू या नेत्रांनी पाहू शकणार नाहीस म्हणाले म्हणून त्याला दिव्यदृष्टी देऊन विश्वरुप दाखवलेलं आहे. त्यांची इच्छा पूर्ण केलेली आहे. त्याप्रमाणे भगवंताची कृपा सर्वांवर असावी भगवद् भक्ती सर्वांच्या अंत:करणामध्ये निर्माण व्हावी अशी भगवान दत्तात्रेयांच्या जवळ प्रार्थना आहे.

**।अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त।**

**। श्री गणेशदत्त गुरुभ्यो नम:।**

**यस्य स्मरणमात्रेण जन्मसंसारबंधनात ।**
**विमुच्यते नमस्तस्मै विष्णवे प्रभविष्णवे ॥**
**नम: समस्तभूतानामादिभूताय भूभृते ।**
**अनेकरुपरुपाय विष्णवे प्रभाविष्णवे ॥**

भगवान नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांची जयंती कालच झाली. कारंजा ही त्यांची जन्मभूमी आहे. कालपासून तेथे उत्सवाला आरंभ झालेला आहे. संकल्प करतो आपण पण त्या संकल्पाप्रमाणे अखंड आणखी चालू रहाणं हे ईश्वरकृपेशिवाय होऊ शकत नाही. ईश्वरालाही त्या संकल्पाचं सहाय्य होऊ शकतं. हे अशा ठिकाणी दिसून येतं. अनेक मंडळी अशा ठिकाणी येतात. सहकार्य करतात. बरेच दिवस ईश्वराची अखंड सेवा घडावी ही बुद्धी ईश्वरकृपेनेच उत्पन्न होणारी आहे. त्याप्रमाणे अशा ठिकाणी आणखी चालू आहे. ईश्वरसेवा, सद्गुरुंची सेवा, भक्ती.

सायंदेव मोठे भक्त होऊन गेले नृसिंह सरस्वती महाराजांचे, ते ज्या वेळी आपल्या गावाहून महाराजांच्या दर्शनाकरता आले त्यावेळी गुरुचरित्रात वर्णन केलेले आहे. गाणगापूर दिसल्याबरोबर सायंदेव लोटांगण घालत निघालेले आहेत. मोठे अधिकारी होते. ते एका मुसलमान सरदाराच्या जहागिरीमध्ये,परंतु अहंकार नाही काही नाही. ते स्थानदर्शन झाल्याबरोबर निघाले. आले मठात,महाराजांचं दर्शन झालेलं आहे. त्यांच्याकडेच महाराजांनी त्यांचा नातू का पणतू सायंदेव, नागनाथ, सरस्वती गंगाधर, पाचवी पिढी सरस्वती गंगाधर. त्यांना

चरित्र लिहीण्याची आज्ञा केली. सिद्धरुपाने आणि गुरुचरित्र लिहिलेलं आहे कानडी भाषेमध्ये. कानडी प्रांतात त्याचा जन्म झाला, पण मराठीमध्ये हे चरित्र आहे. अत्यंत प्रासादिक ग्रंथ आहे. गुरुचरित्राचे संस्कृत भाषांतर, संस्कृत अनुवाद सद्‌गुरु वासुदेवानंद सरस्वती महाराजांनी केला. ते चरित्र आहेच. आणखी नवीन काही चरित्र वगैरे त्यांनी स्वतंत्र लिहीले नाही. संस्कृतमध्ये त्याचाच अनुवाद समश्लोकी आहे, द्विसाहस्त्री आहे. सर्व संस्कृत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना उपयोगी पडण्याकरता त्रिशती काव्य आहे.तीनशे श्लोकांमध्ये काव्यरुपाने. वेगवगळी वृत्त आहेत. अलंकार आहेत. टीकाही आहे. असं मोठं काव्य त्यांनी केलेलं आहे. तर हे अशा प्रकारचं ईश्वरकृपेने, संकल्पानी हे कार्य चालू आहे. ठिकठिकाणी चालू आहे, नरसोबावाडी, गाणगापूर ही तीर्थक्षेत्र महाराजांच्या वास्तव्याने पवित्र झालेली. त्या ठिकाणी महाराज राहिलेले आहेत. ५०० वर्षे होऊन गेली तरी अद्यापि कार्य चालू आहे. भक्तांचं मनोरथ पूर्ण करण्याचं.हे सगळं व्यवस्थित चाललं आहे.पण ठिकठिकाणी जी भक्त मंडळी आहेत, ईश्वरभक्ती, गुरुभक्ती पूर्व सुकृताने त्यांच्या मनामध्ये उत्पन्न झालेली आहे. त्यांनाही समाधान मिळालं. या दृष्टीनं ईश्वराच्या, सद्‌गुरुंच्या कृपेनं अशा अनेक ठिकाणी उत्सव वगैरे होत असतात.

'सर्वामुखी मंगल बोलवावे।' 'सर्वांचं कल्याण व्हावं' 'सर्वेपि सुखिनः सन्तु ।' ही मोठी महात्म्यांची इच्छा असते. वासना नाही. त्यांना संतांना, पण ही इच्छा प्रगट करतात. पसायदान, ज्ञानेश्वर महाराजांनी सर्वांच्या करता मागून ठेवलेलं आहे. देवाजवळ मागितलेले आहे. तर अशी ही सद्‌गुरुभक्ती, ईश्वरभक्ती, ही अखंड जीवनापर्यंत

चालू राहिली पाहिजे.त्याकरता आपलं जीवन आहे. हे लक्षात पाहिजे. नाथमहाराज कधीही रागवत नव्हते म्हणतात. गावातल्या लोकांनी, एक असा रागीट मनुष्य होता तो म्हणे 'मला फार राग येतो.' 'तू नाथांना भेट' म्हणाले. तो भेटायला आला आणि त्यांनी विचारलं मला फार राग येतो, कशाने जाईल? म्हणाले, तुम्ही रागवत नाही. ते काही बोलले नाहीत. म्हणाले, उद्या तुला १२ वाजता मृत्यु येणार आहे. परवा एक कीर्तनकारांनी ही गोष्ट सांगितली, घाबरला तो. घरी गेला. काही चैन पडत नाही. मरण येणार, मरण येणार, दुसऱ्या दिवशी ती वेळ टळून गेली. आणि भेटायला आला नाथांना. आणि विचारलं माझ्या प्रश्नाचं तुम्ही उत्तर दिलं नाही म्हणाले. दिलंय की म्हणाले. मरणाची भीती तुला वाटली म्हणून एक दिवसापुरतं संसारातलं लक्ष तुझं उडालं. ती मरणाची भीती नेहमी माझ्यासमोर असल्यामुळे मला राग येत नाही म्हणाले. मरणाची भीती मनामध्ये आहे. जीवन संपावं अशा प्रकारची कल्पना करुन उपयोग नाही. हे ईश्वराचं कार्य आहे. ते कार्य जर आपल्याकडं आलेलं आहे तर उगीच जीवन संपावं, अमुक करावं काय करायचयं हे. आणि इच्छेनं कुठे जीवन संपतं काय?आयुष्य ठरलेलं आहे. गर्भामध्ये जीवात्मा असतानाच त्याला हे सगळं दिलेलं आहे देवांनी. तर त्याप्रमाणे मृत्यु सर्वांनाच आहे. 'मरणान्तचि जीवितम् ।'विदूरजींचा उपदेश आहे. धृतराष्ट्राला केलेला आहे. जीवीत हे शेवटी मरणाउत्तर, याप्रमाणे ईश्वराच्या इच्छेने कर्तव्यकर्म प्राप्त झालेलं आहे ते ईशसेवा बुद्धीनं करत आहेत.त्यामुळे अहंकारही निर्माण होत नाही. ईश्वराची सेवा आहे.

गाणगापूरमध्ये महाराज गेल्याबरोबर एका ब्राह्मणाच्या घरी भिक्षेला गेले. म्हैस बांधली होती. आदर सत्कार केला, बसायला दिलं,म्हणाली, ''पती भिक्षेला गेलेले आहेत. त्यांनी भिक्षा आणली की मी आपल्याला स्वयंपाक करुन वाढते.'' महाराज म्हणाले, ''तुमच्या घरात म्हैस दिसती आहे. आम्हाला काय दूध मिळालं तरी हरकत नाही. स्वयंपाकच झाला पाहिजे असं नाही.'' ती म्हणाली, ''कधी दूध न देणारी म्हैस आहे ती वांझ आहे. वासरु नाही काही नाही. कामाला नेतात. रोज काय चार पैसे मिळतात त्याच्यावर चाललंय.'' महाराज म्हणाले, ''अहो ही तर दूध देणारी म्हैस आहे. नाही कसं म्हणता तुम्ही?''त्याबरोबर तिच्या मनामध्ये पूर्वसंस्काराप्रमाणे आणि महात्म्यांच्याबद्दल आणखी श्रद्धा निर्माण झाली. महाराज म्हणतायत ना. ती डोळ्यांनी आपल्याघरात असणाऱ्या म्हशीची परिस्थिती जाणणारी आहे. तिच्या डोळ्यासमोर ती म्हैस आहे प्रत्यक्ष प्रमाण आहे. म्हैस दूध देत नाही. बहुमतही म्हैस दूध न देणारी आहे. असंच आहे.गावातले सगळे लोक म्हणतात म्हैस दूध देत नाही. आणि एकटे महाराज सांगतात. आणि ती बाई गेली, भांडं घेऊन गेली. दूध मिळालं, दूध तापवलं आणि महाराजांना दिलं दूध. दूध घेऊन गेले, आशिर्वाद देऊन. आता त्यांच्या आज्ञेनं म्हशीनं दूध दिलेलं आहे. कसं दिलं काय दिलं ती त्यांची शक्ती आहे. तर त्या बाईला, पुढंही ती वागली संसारामध्ये काहीही कर्तृत्व आपल्याकडे आहे असं कधी तरी त्या बाईला कळेल का? कधीतरी बुद्धी होईल का ? कधीही दूध न देणारी म्हैस दूध देऊ शकते महात्म्यांच्या शब्दानं. असं सर्वही कर्तृत्व त्यांचं आहे. हे शिकवण्याकरता महाराजांनी

ही योजना केली. पहिली गोष्ट आहे. गाणगापुरात गेल्यानंतर श्रद्धेचं अप्रतिम उदाहरण आहे.

गुरुचरित्रातल्या कथा फार मनोहर आहेत. तर अशा रीतीनं ईश्वराच्या आज्ञेनं सुरु झालेलं कार्य. त्या कार्याबद्दल कर्तृत्व अभिमान कधीही उत्पन्न होऊ शकत नाही. त्यांच्या आज्ञेकडं लक्ष त्यांची आज्ञा आहे. पूर्ण करणारी शक्ती तीच आहे. 'प्रदिबुद्धीप्रदातृप्तावहिसिद्धी प्रतृप्तता: ।' सिद्धी बुद्धी पती म्हणतात  परमेश्वर. मनामध्ये बुद्धी उत्पन्न करणाराही तोच आहे.एवढं लक्ष असलं म्हणजे संपलं.मृत्यूची भीती मनामध्ये पाहिजे. भीती, म्हणजे सामान्य शब्द आहे. तो येणार आहे.येईल त्या वेळेला येईल. तर याप्रमाणे हे कार्य जे आहे ते अखंड चालू राहिलेलं आहे. या दृष्टीनं करत रहायचं. ईश्वरसेवा आहे. भगवंतांनी अर्जुनाला सांगितल्याप्रमाणे लोकसंग्रहही आहे.आणि कर्तृत्व ईश्वराचं, देणं ईश्वराचं हे लक्षात राहिलं पाहिजे. म्हणजे संपलं. आणखी याप्रमाणे हा भक्तीमार्ग संतांनी घालून दिलेला आहे. संतांचा संकल्प आहे. ईश्वरभक्ती अखंड वाढावी, चालावी, समर्थांनी १२ वर्ष तीर्थयात्रा करु सगळी लोक निरिक्षण, लोकपरिस्थिती पाहून आणखी स्वतंत्र राजा निर्माण केला. राष्ट्र निर्माण केलं. आणि दासबोध ग्रंथरुपाने स्वत: ते राहिलेले आहेत. कल्याण स्वामींना मुक्त केलं, दर्शन दिलं त्यांना आणि अशा रितीनं ईश्वराच्या संकल्पाची अखंड चालू असलेलं कार्य पुरे कशाला म्हणायचं. त्याची सेवा घडते आहे, चालू आहे, चालू ठेवायचं. कालसिद्धी त्यांच्याकडं आहे.

वेदव्यासांनी सिद्धांत केलेला आहे 'काल अत: उपपत्ते ।' कर्माने फल मिळत नाही. कर्मज्ञाता जो आहे कर्म जाणणारा जो आहे. प्रमोशन

हे नुसत्या कर्मानं सेवेनं मिळत नाही. सेवा जाणणारा हा वरचा अधिकारी उत्तम सेवक आहे. त्यामुळे प्रमोशन मिळून जातं.त्याप्रमाणे कर्माचं ज्ञान ज्याला आहे त्या कर्माला लागणारी बुद्धी त्याबुद्धीला प्रेरणा करण्याची शक्ती ज्यांच्याजवळ आहे अशा सर्वांतर्यामी परमेश्वराचं कार्य केवढं आपल्या हातून होईल तेवढं घडतं हीच सेवा आहे त्याची. त्याप्रमाणे एक दिवस का होईना आम्हाला इथं येता आलं महाराजांच्याकृपेनं.या ठिकाणी सर्वही मंडळींची श्रद्धा, भक्ती, गुरुभक्ती, ईश्वरभक्ती कशी आहे ही दाखवण्याकरता महाराज आम्हाला पाठवित असतात. अशा ठिकाणी जा तुम्ही आणि पाहून या. म्हणजे आपल्याही मनामध्ये काही दोष असतील तर ते दोष दूर होण्याला त्याचा उपयोग होतो. तेव्हां अशा रितीनं हा भक्तीमार्ग अखंड वाढावा आणि सर्वही एकंदर समाजामध्ये असणारे जे साधकमार्ग आहेत, चांगले असो अथवा चांगल्या बुद्धीनं, दुर्बुद्धीने कसंही असो तरी सर्वांची बुद्धी शुद्ध व्हावी हे पहिलं मागणं ज्ञानेश्वर महाराजांचं. 'जे खळांची व्यंकटी सांडो।' बुद्धी चांगली करा देवा.

त्यानंतर सत्कर्माची रती हे दुसरं मागणं आहे. कर्म हे अत्यंत प्रेमानी ईश्वरसेवा म्हणून व्हायला पाहिजे.पण अगोदर दोष बुद्धीतले गेले पाहिजेत. त्या संतमहात्म्यांनी सर्वांची काळजी घेतलेली आहे.बुद्धीमध्ये असलेले दोष जावेत अशीही प्रार्थना केलेली आहे. पापक्षय व्हावा अशीही प्रार्थना केलेली आहे.आणि सत्कर्माचरण त्यांच्या हातून घडावं अशीही प्रार्थना केलेली आहे.आणि त्याचं फळही 'जो जे वांछिल तो ते लाहो प्राणीजात।' 'तुझीया सत्तेने तुझे गुण गाऊ। जेणे सुखी राहू सर्वजण।' ५८ वर्ष झाली म्हणजे संपलं सगळं.

सोडून चला, जागा सोडून चला, नोकरी सोडून चला असं नाही काही नाही. अखंड आणखी कृपा आहे. जन्माला ज्यांनी घातलं आहे त्याला ती काळजी नाही असं कसं म्हणता येईल? तितका अखंड मनामध्ये विश्वास तळमळ ही जितकी जितकी अखंड मनामध्ये उत्पन्न होईल तितकी अधिकाधिक ती शक्ती व्यक्त होत आहे.

तर अशा रीतीनं सर्वांच्या कडून अशीच भगवद् भक्ती अखंड घडावी. सर्वही संतमहात्म्यांनी सांगितल्याप्रमाणे एकनाथ महाराज आहेत, ज्ञानेश्वर महाराज आहेत, नामदेव आहेत, तुकाराम आहेत. सर्वही संतांचा हाच उपदेश आहे. आणि त्यांनी करुन दाखवलेलं आहे. आधी केले मग सांगितले अशी ती मंडळी आहेत. तर सर्वांच्या द्वाराने आणखी भगवद् भक्ती घडावी. त्यांचं आणि त्यांच्या परिवाराचं सर्वही संसाराचा परिवार असो किंवा इतरही परिवार असो, जितकी जितकी व्यापक बुद्धी आपली होत जाईल ती ईश्वराची देणगी आहे. ममता हा दोष आहे व ममता हा गुणही आहे. केवळ आपला मुलगा, आपला परिवार एवढीच ममता नाही तर सर्वच आपले आहेत सर्वही जे काही संकटग्रस्त असतील त्यांच्याही संकटाचं निवारण करण्याकरता ईश्वराची प्रार्थना आहे. जे ईश्वर भक्त असतील त्यांच्या बद्दल प्रेम अंत:करणात उत्पन्न होणं हा ही अभ्यास सांगितलेला आहे. पुण्य करणाऱ्या भूताबद्दल अत्यंत आनंद मनामध्ये वाटण्याचा अभ्यास केला पाहिजे. आणि निंदा करणारे पापी लोक आहेत त्यांची उपेक्षा करण्याचं शिकलं पाहिजे. हा अभ्यास आहे.योगसूत्रकार सांगतात, 'मैत्री, करुणा,ममता, उपेक्षा, सुखदु:ख, पुण्यापुण्य विषयाणां चित्तप्रसाधनं।' प्रसन्न चित्त त्या आत्म्याचं. हे सगळं ठेवलं

आपल्यासमोर, त्याला काळजी आहे. जन्म ज्याने दिलेला आहे त्याला काळजी नाही तर त्याच्या इतकं वत्सल, दयाळू दुसरं कोणीही नाही.

उद्धवजी त्यांचे मोठे भक्त. लहानपणापासून. ती पूतना राक्षसी स्तनामध्ये विष भरुन घेऊन मारण्याकरता आलेली असताना तिला उत्तम गती ज्यांनी दिली, त्याच्यासारखं दयाळू कोणीच नाही. तर असे मोठे भक्त होऊन गेले. भक्तांची चरित्र वाचणं संतांच्या चरित्रवाचनाने पुष्कळ आणखी बुद्धीला प्रेरणा होते आहे. दोष समजतात. दोष जातात, सगळं होतं. म्हणून हा भक्तीमार्ग संतांनी मुद्दाम सगळ्यांना सोपा वाटावा, कळण्यासारखा म्हणून घालून दिलेला आहे. संसार निवृत्तीही त्याच्यातून होते आहे ना। उत्सव करायचे म्हणजे संसारातलंही चित्त आपलं हळूहळू कमी होतं आणि याप्रमाणे भगवद्भक्ती अखंड वाढावी आणि सर्वांचं कल्याण व्हावं 'सर्वेपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयः। सर्वे भद्राणी पश्यन्तु मा कश्चित दुःखमाप्नुयात्।'

**अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त।**

। श्री गणेशदत्त गुरुभ्यो नम:।

नित्यं स्मरामि ते पादे हतरवेदे सुखप्रदे
प्रदेहि मे शुद्धभावं भावं वारवेदद्रुतम्

गायत्रीचे चोवीस लक्ष पुरश्चरण करुन त्याचं सर्व देवतांना हवन म्हणून गायत्री यज्ञ करतात. त्यावेळी सर्व देवतांचं पूजन करतात.भारतामध्ये सर्वही लोकांच्या मनामध्ये ईश्वराच्या अस्तित्वाची खात्री व्हावी, सर्वांच्या मनात श्रद्धा उत्पन्न व्हावी याकरता सगळ्याही संत महात्म्यांचे सदैव प्रयत्न झाले आहेत आणि होत आहेत. ईश्वराचं अस्तित्व मान्य केल्याशिवाय पूर्ण सुखाची प्राप्ती होणार नाही. जरी सर्व सुख मिळाली तरी ईश्वराचे भजन,पूजन कधी आपल्याकडून सुट्टू नये अशी ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदानाच्या शेवटी प्रार्थना केली आहे.ईश्वराचे अस्तित्व मान्य करायचे म्हणजे आधी ईश्वर म्हणजे कोण आहे हे समजून घेतलं पाहिजे. याचा उपदेश भारतवर्षामध्ये या गायत्रीच्याद्वाराने आठ वर्षांच्या मुलाला केला जातो. इतर कोणत्याही देशामध्ये ही कल्पना नाहीये. ही गायत्रीमंत्राची दीक्षा दुसऱ्या कोणत्याही देशामध्ये नाहीये.तिथे काही तत्वज्ञानी मंडळी होऊन गेली असतील,त्यांनी काही ग्रंथही लिहीले असतील. पण आज हजारो वर्षे भारतवर्षामध्ये आठ वर्षाच्या मुलाला उपनयनाच्या वेळेला ईश्वराचा हा मंत्र सांगितला जातो आणि त्या दिवसापासून ही ईश्वराची कल्पना त्याच्या मनामध्ये रहावी आणि त्याने आपल्या जीवनाचे साफल्य करुन घ्यावे अशी त्याच्या मागची इच्छा आहे. हे भारतवर्षाचं मोठं वैशिष्ट्य आहे.सर्वांच्या बुद्धीला प्रेरणा करणारी अशी एक शक्ती आहे एवढीच जाणीव त्यांनी करुन दिली आहे. ईश्वराचे दर्शन करु घेणाऱ्या

महात्म्यांनी किती तप केलं असेल, किती त्याग केला असेल,किती अनासक्ति असेल त्यांच्या ठिकाणी. देहाकडे पहायचं नाही, संसाराकडे लक्ष नाही.किती कष्ट घेतले असतील त्यावेळेला त्यांना ईश्वराचं दर्शन झालेलं आहे.

भारतवर्षामध्ये होऊन गेलेले मोठमोठे संत महात्मे ईश्वरसाक्षात्कारी होते.''आधी केले मग सांगितले'' ही त्यांची पद्धती आहे. उगीच सांगायला जात नाहीत कुणाला. अगोदर करायचं, त्याचा प्रत्यक्ष अनुभव घ्यायचा असं त्यांचं होतं.भारतवर्षामध्ये भक्तिमार्ग किंवा योगमार्ग हे प्रयोग शास्त्र आहे. मोठमोठ्या संतानी हे प्रयोग करुन, त्याचा अनुभव घेऊन नंतर उपदेश केलेला आहे. तर **या गायत्रीमंत्रामध्ये जे ईश्वराचं स्वरुप सांगितलं आहे त्याचा अर्थ समजावून घेऊन त्याप्रमाणे जर जप झाला तर ती ईश्वराची मोठी उपासना आहे.**

सर्व संतांनी भक्तिमार्गाचा प्रसार केलेला आहे. भक्तिमार्ग सोपा समजतात. या गायत्री मंत्राच्या द्वाराने बालवयातच ईश्वराचं स्वरुप समजावून दिलं जातं.**आरंभापासून त्याच्यावर पालकांचंही लक्ष पाहिजे. बालकाने संध्या केली की नाही, जप केला की नाही, उपनयनाच्या वेळी त्याला गायत्रीमंत्राचा उपदेश केला म्हणजे कार्य संपलं असं नाही.** परवा आम्ही नाशिकच्या एका गृहस्थांकडे पाहिलं, आजोबा आपल्या दोन नुकत्याच मुंज झालेल्या नातवांना पहाटे लवकर उठवून त्यांच्याकडून स्नानसंध्या गायत्री जप वगैरे करवून घेतात आणि काही खाऊनच ती मुलं साडेसात वाजता शाळेत जातात. म्हणजे आज असंही उदाहरण पहायला मिळतं. उपनयन झाल्यानंतर

तो अधिकारी झालेला आहे. त्याला त्या मंत्राचा अर्थ समजावून सांगणं, त्याच्याकडून जप करवून घेणं हे महत्वाचं कार्य आहे. अगदी बालवयापासूनच जर हे झालं तर पुढे त्याच्या आयुष्यात त्याला व्यावहारिक कल्याणही साधता येईल आणि पारमार्थिक अधिकारही प्राप्त करु घेता येईल. तर अशा रितीने ईश्वराची उपासना करणं हे भारतवर्षाचे वैशिष्ट्यं आहे.

तिकडे पाश्चात्य देशातही आता मंदिरे होऊ लागली आहेत.परवा नाशिकची काही मंडळी अमेरिकेला जाऊन आली. त्यांनी गणेशमूर्तीची स्थापना तिकडे केली. केवळ अर्थार्जन करणं आणि विषयभोग घेणं यांनी काही समाधान नाहीये असं त्यांनाही आता वाटायला लागलंय. आपल्याला वाटतं पुष्कळ संपत्ती मिळावी.पुष्कळ पगार मिळावा, म्हणजे आपण सुखी होऊ पण किती तरी संपत्ती ज्या देशामध्ये आहे त्या देशातली मंडळी सुखी नाहीयेत. त्यांना या मार्गाकडे येण्याची बुद्धी होऊ लागलेली आहे. मार्गदर्शन करणारे-संत महात्मे भारतवर्षातून तिकडे जातात, त्यांना उपदेश करतात.

**उपासनामार्ग हा खऱ्या सुखाचा मार्ग आहे. ईश्वराची उपासना, ''उपासनेला दृढ चालवावे'' असं समर्थांनी सांगितलं आहे. व्यक्तिश: आपलं कल्याण करुन घेण्याकरता ईश्वराची उपासना सतत चालू पाहिजे.** महाभारतामध्ये द्रौपदीचे उदाहरण दिलेलं आहे. धर्मराज मोठे धार्मिक हाते. सत्यनिष्ठ होते, अजातशत्रू होते. हे सगळं जरी खरं असलं तरी ज्या वेळेला दुर्वास ऋषी त्या ठिकाणी आले. वनवासात गेल्यावर धर्मराजांनी सूर्यनारायणाची प्रार्थना केली. काही तरी गायत्री मंत्राची उपासना त्यांची असली पाहिजे.

सूर्यनारायण प्रसन्न झाले आपल्या आश्रमात निरनिराळे ऋषी, मुनी,तपस्वी पुरुष येणार. मध्यान्हकाली आलेल्या अतिथींना तसंच विन्मुख कसं पाठवायचं? आम्हालाच खायला काही नाही तर अतिथींना कुठून द्यायचं वगैरे असले विचार त्यांच्या मनात आले नाहीत. मुख्य जे अन्नदानाचे व्रत आहे ते वनवासात असतानासुद्धा आपल्या हातून पाळलं जावं यासाठी त्यांनी सूर्यनारायणाची उपासना केली आणि सूर्यनारायणाने त्यांना ते पात्रं दिलं. सूर्योदयानंतर पूजा केल्यावर या पात्रांतून वाटेल तितकं अन्न तुम्हाला मिळेल पण द्रौपदीचे जेवण झालं की अन्न बंद होईल,असं त्यांना सांगितलले. आता द्रौपदीने जेवायचे केव्हा? धर्मराजाने सगळी तयारी करुन ठेवली. म्हणजे धर्मराजांना जे धर्माचरण करण्याची इच्छा होती त्यात द्रौपदीचं सहाय्य भरपूर झालंय असं म्हणायला हरकत नाही. रात्री दहा–बारा वाजेपर्यंत तिने जेवण करु नये. कारण जेवण झाल्यावर अन्न बंद झाल्यानंतर कुणी अतिथी आले तर आणि तसंच झालं. दुर्योधनाच्या सांगण्यावरुन दुर्वास ऋषी तिथे आले ना! द्रौपदीचे जेवण झाल्यानंतर तुम्ही त्यांच्या आश्रमात जा आणि जेवायला द्या म्हणून सांगा असं दुर्योधनाने त्यांना सांगितलं आणि त्यांनी ते कबूल केलं.

त्या दिवशी रात्री दहा–बारा वाजले. आता कुणी येणार नाही अशा विचाराने द्रौपदीने जेवण केले आणि पात्रं घासून पुसून ठेवून दिलं. आणि नेमके त्याच वेळेला दुर्वास ऋषी आपल्या सगळ्या शिष्यमंडळींसह जेवायला आले. आता कुठले अन्न द्यायचं? सत्व परिक्षाच होती. पात्रं तर घासून ठेवलं आहे. जेवण झालेलं आहे.

धर्मराज जरी मोठे धर्मशील असले तरी या अशा प्रसंगी काय

करणार? धर्मराजांच्या धर्मशीलतेचं उदाहरण महाभारतकारांनी दिलेलं आहे. त्यांचे चारी बंधू गतप्राण होऊन पडलेले असताना त्या यक्षाने विचारलेल्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिली आणि ते चौघेही बंधू जिवंत झालेले आहेत. ही त्यांची शक्ती आहे. पण या वेळेला द्रौपदीची परीक्षा आहे. द्रौपदी धर्मराजांना सर्वतोपरि सहाय्य करणारी जरी असली तरी गोपालकृष्णांवर प्रेम होतं तिचं. त्या प्रेमाने गोपालकृष्णांना तिने हाक मारली आणि देव तिथे आले. त्या संकटातून त्यांची मुक्तता केली. द्रौपदीने दिवसभर उपाशी रहायचे म्हणजे तिला भूक लागतंच नव्हती. अन्न समोर असताना खायचं नाही भूक लागली तरी. कारण आपण जर जेवलो तर हे अन्न बंद होणार आणि मग दुसरी मंडळी कोणी आली तर त्यांना काय देणार. ही धर्मभावना जर मनात असेल तर धर्माचं आचरण होतं. ते धैर्य आपोआप निर्माण होतं. अन्नपाणी काहीही न घेता ती बिचारी अन्नदान करीत होती. आणि ते सहाय्य धर्मराजांना वनवासामध्ये मुख्यत्वेकरुन झालेलं आहे.

**लोकशाहीमध्ये अनेकांच्या बुद्धीला प्रेरणा देणारे कायदे करतात,पण तसं असतं का? हाही विचार केला पाहिजे. जो कोणी बुद्धिमान मान्यवर म्हणून जो असतो त्याची इच्छा जशी असेल तसं काम होतं. त्याची एकट्याचीच बुद्धी. तो सांगेल त्याप्रमाणे त्याच्या पक्षाच्या माणसांनी मतं द्यायची. सगळे कुठं विचार करताहेत? वस्तुत: लोकशाही अशी दिसतंच नाही.** अशा प्रकारचं अनुष्ठान करायची सर्वांना प्रेरणा झाली आणि सर्वांनी यथाशक्ति त्याला सहाय्य करुन ते कार्य पार पाडलेलं आहे. हाच गायत्रीमंत्राचा अर्थ आहे. वटहूकूम काढून अशी कार्य घडत नसतात. सर्वांच्या

बुद्धीला प्रेरणा करणारी शक्ति. तर सर्वांच्याच बुद्धीला प्रेरणा झालेली आहे त्याअर्थी ईश्वराचीच ही प्रेरणा आहे. त्याचंच कार्य आहे. समष्टि म्हणजे ईश्वर आहे हे आपल्या शास्त्रकारांनी सांगितलेलं आहे.

**शेवटच्या पसायदानामध्ये ज्ञानेश्वर महाराजांनी बुद्धी कशी असावी, कशी बनवावी हेच सांगितलेलं आहे ना! बुद्धीचा विकास कसा झाला पाहिजे, तरच त्या व्यक्तिचं कल्याण आहे, समाजाचं, राष्ट्राचं कल्याण आहे. असा बुद्धिविकास झाला पाहिजे. ''भूता परस्परे पडो मैत्रं जीवाचे'' हीच प्रार्थना ज्ञानेश्वर महाराजांची आहे. सर्वांनी सौहार्द्र भावाने रहावं, सर्वांचं परस्परांवर प्रेम असावं हे काय राजशासनाला करता येणं शक्य आहे का? तसा वटहुकूम काढून त्याप्रमाणे होणार आहे का? ज्ञानेश्वर महाराजांनी केलेली प्रार्थना राष्ट्र कल्याण करणारी आहे. ते परस्परांबद्दलचे ऐक्य नष्ट झालं तर काय भयानक परिस्थिती निर्माण होते ते आपण रोज वाचतोच आहोत पेपरमध्ये. (पंजाब) कोणी काय बुद्धिभेद निर्माण केला समजत नाही. सर्वांनी एकमेकांवर प्रेम करावं असं काय कायदा करुन शक्य होईल का? त्याकरता बुद्धीला प्रेरणा करणारी कोणी तरी शक्ती आहे असं मान्य केलं म्हणजे आपोआप सगळं कोडं सुटतं. त्याकरता ज्ञानेश्वर महाराजांनी देवाजवळच प्रार्थना केली. ईश्वरानेच मला हे पसायदान द्यावे अशी प्रार्थना करुन त्यांनी हे मागणं मागितलं आहे. ''आता विश्वात्मके देवे ...... भूता परस्परे पडो मैत्र जीवाचे''**

तर आजही हे ''भूता परस्परे पडो''हे जर घडले नाही तर राष्ट्र धोक्यात येईल. हे सर्वांना मान्य करायला पाहिजे. त्याकरता सर्वांनी

एकमेकांवर प्रेम केलं पाहिजे.म्हणजे तसा ठराव किंवा कायदा करुन भागणार नाही.परस्परांवर प्रेम करायचं म्हणजे त्यात काहीतरी त्याग आलेला आहे. आपल्या स्वत:च्या फायद्याकडे जो पर्यंत लक्ष आहे तो पर्यंत हे प्रेम वगैरे वरकरणी आहे. म्हणून संत महात्म्यांनी जे काय मागायचे ते देवाकडे मागितले आहे.त्यांची जी मागणी आहे ती राष्ट्रहिताची आहे. सर्व समाजाच्या हिताची आहे. केवळ व्यक्तिकरता नाही. संतांनी भगवत् भक्तीचा प्रसार करुन राष्ट्र निष्क्रिय बनवलं असं मोठमोठ्या बुद्धिमान लोकांनी लिहून ठेवलं आहे. काय? निष्क्रिय म्हणजे नेमकं काय बनवलं आहे?काही तरी उपासना मार्ग दाखवला आहे. ईश्वरशक्तीची उपासना करुन शांती मिळते कि नाही पहा असं त्यांनी स्वत: अनुभव घेऊन सांगितलं. ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदानामध्ये सांगितलेला बुद्धिविकास वेगळा आहे. हल्ली जो बुद्धिवाद आपण पहातो ---ईश्वर नाही, परलोक नाही, धर्म नाही, धर्मातीत राज्यच पद्धती करुन टाकणं--- हा बुद्धिवाद नाही. आपल्या बुद्धीला प्रेरणा करणाऱ्या ईश्वरशक्तीची उपासना करणं,ध्यान धारणा करणं, तिचे ज्ञान मिळवणं असं किती तरी संतांनी सांगितलं आहे. त्या उपासनेच्या योगाने मानसिक शांती मिळते,आरोग्य लाभते,म्हणून संतांनी हा उपदेश केलेला आहे. कोणी कबूल करा कि न करा. दुसऱ्यांची, समाजातल्या लोकांची दु:ख त्यांना पहावत नाहीत. दयाळू असल्यामुळे सर्व जीव दु:खातून दूर व्हावेत असं त्यांना वाटतं आणि तसे ते प्रयत्न करतात. त्या दयेमुळे हा उपदेश ते करीत असतात. आणि तो उपदेश ज्यांना पटलेला आहे ते त्या मार्गाने जाऊन शांती व सुख प्राप्त करुन घेतात.

तर स्मृतिकारांनी मुद्दाम सांगितलंय,,केवळ गायत्रीची उपासना जरी झाली तरी सुख प्राप्त होते. शास्त्राने सांगितलेले सर्व नियम पाळून नियमाने जर गायत्रीची उपासना झाली तर तो उपासक श्रेष्ठ होतो.केवळ अर्थार्जनासाठी वेदांचा अभ्यास केलेला असला तरी त्याला किंमत नाहीये. नुसत्या ज्ञानाला महत्व नाही. तप पाहिजे, काही तरी आचार पाहिजे. नुसतं सांगणारा , बोलणारा (पण स्वत: मात्र आचार न पाळणारा) खरा पंडित नाही. त्याप्रमाणे वागणारा जो आहे तो खरा पंडित आहे. तर ज्ञान जरी मिळालं तरी ज्ञानाप्रमाणे आचरण घडलं पाहिजे. आपल्या प्राचीन आचरण पद्धतीमध्ये तिकडे फार लक्ष दिलं आहे. अगोदर ब्रम्हचर्याश्रमामध्ये सर्व वेदशास्त्रांचं ज्ञान करुन घ्यायचं. उत्तमोत्तम ज्ञान. व्यक्तिधर्म कोणचे आहेत, समाजाचे धर्म कोणचे आहेत, राजधर्म कोणचे आहेत, सगळं धर्मांचं ज्ञान शास्त्रकारांनी सांगितलं आहे. आणि राजावर तर फारच मोठी जबाबदारी आहे. सगळ्या लोकांचं, धर्मांचं ज्ञान त्यांनी करुन घ्यायचं आहे. आणि त्या त्या प्रमाणे सगळे प्रजाजन वागताहेत कि नाही हे पहायचे आहे. ते आस्तिकतेने वागताहेत कि नास्तिकतेने वागताहेत ही तपासणी राजाने करायची आहे. त्यासाठी राजाला सर्व ज्ञान पाहिजे ना! मनु मोठे समाजशास्त्रज्ञ होऊन गेले.

महाभारतातल्या शांतिपर्वात धर्मराज आणि भीष्माचार्यांचा संवाद झालेला आहे. धर्मराजाला शेवटी पश्चात्ताप झाला. उगीच मी लढाई केली, इतके लोक मारले गेले, त्यांची हत्या माझ्या डोक्यावर आली वगैरे वगैरे. म्हणजे युद्ध सुरु होण्याच्या वेळेला अर्जुनाच्या मनाची स्थिती झाली होती त्याचप्रमाणे युद्ध संपल्यानंतर धर्मराजाच्या मनाची

स्थिती झाली. अर्जुन म्हणाला, ''मी युद्ध करणार नाही. माझेच लोक माझ्या हातून मारले जातील. त्यापेक्षा मी आपला वनात जाऊन भिक्षा मागून राहीन.'' धर्मराजालाही तसंच वाटलं. म्हणाले, ''मी राज्य करणार नाही. माझ्या हातून पुष्कळ युद्धं झाली आहेत. मला नरकामध्ये जावं लागेल. मला राज्य नको. मी आपला वनामध्ये जातो.''

अशी त्याची स्थिती झाल्यावर श्रीकृष्णांनी, त्याला भीष्माचार्यांकडे जाऊन मग निर्णय घे, असं सांगितलं. भीष्माचार्य मोठे राजकारणी, उत्तम योद्धे आणि पूर्ण ज्ञानसंपन्न होते. त्याचबरोबर त्यांच्याजवळ भगवद् भक्तीही पुष्कळ होती. भीष्माचार्यांचे निर्याण म्हणजे–भगवान श्रीकृष्ण समोर आहेत. त्यांची स्तुती करता करता भीष्माचार्यांचे प्राणोत्क्रमण झालेलं आहे.प्राचीन इतिहासकारांनी असे आदर्श पुरुष, महाभारतासारखे वाङमय निर्माण करून आपल्यासमोर ठेवले आहेत. रामराज्य झालं पाहिजे वगैरे अजूनही लोक म्हणतात. पण रामराज्य म्हणजे काय होतं केवढं धैर्य होतं रामरायांचं. सीतादेवीना रावण घेऊन गेला, कोणी सीतेला नेलं याचासुद्धा पत्ता नव्हता. कोण शत्रूआहे,.कुठे रहातो, काही माहीत नाही.पण रामरायांनी मनाचा निश्चय केलेला आहे.––हा शत्रू कुठेही असू दे त्याला शोधून काढून शासन केल्याशिवाय रहायचे नाही. ह्यांच्याजवळ काय होतं? हे फक्त दोघे बंधू होते. सैन्य नाही, शस्त्रास्त्रं नाहीत, सहाय्य करायला कोणी नाही. अशाही स्थितीमध्ये आपल्या शत्रूला शासन करायचा निश्चय पक्का आहे. अधर्माने वागणाऱ्याला शिक्षा करायचं त्याही परिस्थितीत त्यांनी ठरवलं. म्हणजे हा मनाचा एक पक्का निश्चय आहे, त्याप्रमाणे

धैर्य आहे. सर्व एकंदरीत शस्त्रज्ञान आहेच आहे. आणि अशा निश्चयाने ते पुढे निघाल्यावर सुग्रीवाची भेट झाली, हनुमान भेटले, सर्वांची भेट झाली आपण धर्माप्रमाणे वागत आहोत, अधर्माने वागणारा शत्रू कितीही मोठा असला तरी त्याला शासन केल्याशिवाय रहायचं नाही. हा एक मोठा निश्चय आहे. मोठं धैर्य आहे. त्याप्रमाणे वागून त्यांनी आपला आदर्श सर्वांपुढे ठेवला. वाल्मिकीनी रामायण तेवढ्याकरता लिहीलं. श्रेष्ठ पुरुष कसा पाहिजे, त्याचा आचार बघून इतर मंडळी वागत असतात. लोकांच्यापुढे आदर्श कसा असला पाहिजे हे समजण्याकरता रामायण लिहीलं आहे. रावणाला मारल्यानंतर लंकेचं राज्य बिभिषणाला दिलं. सीतादेवीला आणलं बिभिषणाने,पण तिचा ते काही स्वीकार करेनात. मग सीतादेवीने आपलं पावित्र्य सिद्ध करण्याकरता अग्निप्रवेश केला. साक्षात अग्निनारायण प्रगट झाले आणि त्यांनी सीता देवी पवित्र आहे असं सांगितलं. रामराय म्हणाले, ''हा जो अन्यायी राजा होता त्याला शिक्षा करण्याकरता मी आलो आहे.'' बिभिषणाने रावणाला पुष्कळ समजावलं होतं, ''अरे ही परस्त्री आहे. त्यांची त्यांना देऊन टाक. असं हे चांगलं नाही, हा अधर्म आहे.'' रावणाने बिभिषणाला सांगितलं, ''आम्ही राक्षस आहोत. आम्हाला जगामध्ये कोणतीच स्त्री परस्त्री नाही. वाटेल त्या स्त्रिया आम्ही आणू शकतो.'' ह्या उत्तरामुळे बिभिषणाने त्याची संगती सोडली आणि तो रामरायांना शरण आला. म्हणजे सर्वच स्त्रिया आमच्या आहेत असं म्हणणारा रावण आणि त्याच्या अनुयायांची संस्कृती जगामध्ये राहिली असती तर काय झालं असतं? अशी संस्कृती जगामध्ये होऊ नये. त्या अधर्माचरण करणाऱ्यांना शासन झालं पाहिजे, त्यासाठी प्रयत्न

केले. सीता जर शुद्ध असेल तर तसे तिने स्वत: दाखवलं पाहिजे हे त्यांना दाखवायचं आहे. अमक्या मंत्र्याचा, अधिकाऱ्याचा फोन आला आणि अपराधी निर्दोष सुटला असं जर होत राहिलं तर अपराध नेहमीच होत रहाणार. आपली शुद्धता आपण सिद्ध करायची प्रजाजनांची वृत्ती कायम राहिली पाहिजे. हे रामरायांना दाखवायचं होतं.

तर अशा रीतीने राज्यकारभार त्यांनी केला आणि त्यांचा आदर्श वाल्मिकीमुनींनी आपल्यासमोर ठेवला आहे.द्रौपदीची ईश्वरनिष्ठा कशी आहे हे व्यास महर्षींनी दाखवलेलं आहे. हे सर्व आपल्याला समजावून सांगण्यासाठी संतांनी प्रयत्न केले आहेत. महाराष्ट्राचे हे मोठे भाग्य आहे किती तरी मोठमोठे संत महात्मे इथे होऊन गेले आणि त्यांनी ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, गाथांसारखे ग्रंथ लिहून ठेवले. हे ग्रंथ उत्तम मार्गदर्शन करणारे आहेत. जीवनात शांती, समाधान मिळवण्याचे सगळे उपाय संतांनी सांगून ठेवले आहेत. अनुभवाने सांगितले आहेत. लायब्ररीत जाऊन पुस्तके वाचली आणि त्यांच्यावर आधारीत ग्रंथ लिहून दिला असं नाहीये. तुकाराम महाराजांच्या अभगांच्या वह्या इंद्रायणीत बुडवल्या त्या वेळेला बारा–तेरा दिवस तुकाराम महाराज अन्नपाणी न घेता तिथेच एका झाडाखाली बसून राहिले. त्यांना काय वाटत होतें? अभंग गेले आता माझी कीर्ती कशी राहणार असं त्यांना वाटलं की काय? आपले अभंग गेले म्हणून ते बसले नाहीत. आपण अभंग केले असं समजतच नाहीत. ही त्या पांडुरंगाचीच वाणी आहे. सर्व इंद्रिय त्याची आहेत. सर्वांना प्रेरणा करणारी शक्ती ही ईश्वराची आहे. त्या पांडुरंगाच्या प्रेरणेने, त्याच्या शक्तीने झालेले अभंग गेले

तर लोकांचं काय होईल ही तळमळ मनामध्ये असल्यामुळे देवानेच निर्माण केलेली वाणी राहिली पाहिजे या तळमळीने बारा–तेरा दिवस उपाशी राहीले. आणि पांडुरंगाच्या कृपेने त्यांना त्याचे अभंग परत मिळाले. हे सगळं आपल्या बुद्धीला पटणायरं नाही. आमच्या बुद्धीला म्हणजे ''पटत नाही'' प्राचीन ऋषिमुनी किंवा प्राचीन शास्त्रांचा अभ्यास करणारे केवळ अंधश्रद्धा ठेवणारे नाहीत. तेही बुद्धिवादीच होते. पुष्कळ युक्तिवाद त्यांनी माडला आहे. ईश्वर नाही म्हणणारा युक्तिवाद त्यांच्याकडे आहे, ईश्वर आहे असं सिद्ध करणारा युक्तिवादही त्यांच्याकडे आहे. परंतु आधुनिक बुद्धिवादी आम्हाला हे पटत नाही एकच उत्तर देऊन मोकळे होतो. त्यामुळे हे सगळं अशक्य आहे असं वाटतं आम्हाला. असंभवनीय असं वाटतं. आमची बुद्धी इतकी संकुचित झाली आहे की, चमत्कार म्हणून जे वाटतात ते ''आम्हाला पटत नाही'' एवढंच उत्तर देऊन आम्ही मोकळे होतो. परंतु वाटेल तितका बुद्धीचा विकास होणं शक्य आहे हेच प्राचीन शास्त्रज्ञ सांगताहेत. प्राचीन शास्त्रज्ञांनासुद्धा बुद्धिवाद मान्य आहे. नुसतंच वेदशास्त्राचे अनुसरण करून जातात असं नाहीये.

कालीदासांनी सांगितलंय कि खरे जे बुद्धिवादी असतील त्यांना जगामध्ये अविषय कोणचाच नाही. वाटेल त्या विषयापध्ये ते आपल्या बुद्धीने कार्य करु शकतात. हा बुद्धिवाद कालीदासांनी मांडलेला आहे. चाणक्यानेसुद्धा आपल्या बुद्धीने बुद्धिवादाचा चमत्कार दाखवलेला आहे. नऊ मोंगल राजांचा नि:पात करून चंद्रगुप्ताची स्थापना भारताच्या साम्राज्यावर त्याने केली. केवळ बुद्धिवाद आहे. पण बुद्धिवाद नको असं तो सांगत नाही. परंतु तो बुद्धिवाद म्हणजे

भगवंतांनी गीतेत सांगितलेला आहे. --तस्मात् शास्त्रं प्रमाणम् ते कार्य अकार्य काय आहे याचा विचार करून शास्त्रांचं अनुसरण करून तुम्ही आपली बुद्धी चालवा. शास्त्राचे संस्कार बुद्धिवरती व्हावेत ही त्यांची इच्छा आहे. बुद्धीनेच सर्व कार्य व्हायचंय ना! व्यवहारातील कार्यालाही बुद्धीच मुख्य आहे. बाकीची ईद्रिये अविकारी आहेत. आधी बुद्धीने निश्चय केल्यानंतर कार्याला सुरुवात होते आणि कार्य होतं. परंतु ती बुद्धी मात्र शास्त्र संस्कारयुक्त असावी. बुद्धीमध्ये कोणचे कोणचे दोष आहेत ते दूर करणं, त्याच्यात गुण मिळवून गुणयुक्त बुद्धी मिळवणं असा संस्कार शब्दाचा अर्थ आचार्य महाराजांनी केला आहे. अशी बुद्धी तयार झाल्यानंतर तुम्ही आपली बुद्धी वापरायला हरकत नाही.

आज ''आमची बुद्धी चांगली आहे'' ही आमची कल्पना आहे. पुष्कळ चुका होतात. नंतर चुका कबूल करतो आपण. मोठमोठे नेते आधी चुका करून नंतर जाहीरपणे सांगतात ''हो झालं खरं असं त्या वेळेला'' काही काही मोठे नेते तर ''आम्ही कधीच चुकत नाही'' असंही सांगतात. परंतु हा फाजील विश्वास आपल्या बुद्धीवर ठेवल्यावर चुका ह्या होणारच. म्हणून व्यवहार किंवा परमार्थ उत्तमरीत्या साधण्यासाठी बुद्धीचं सहाय्य आवश्यक आहे हे प्राचीन शास्त्रज्ञांनाही मान्य आहे. परंतु ती आमची बुद्धी अशी आहे तीच बरोबर आहे असा जर अहंकार उत्पन्न झाला तर त्या बुद्धीने काहीही कार्य होऊ शकत नाही. व्यक्तिगतही होणं शक्य नाही आणि सामाजिकही कार्य होणं शक्य नाही. म्हणून ही परिस्थिती झाली आहे ना! आमच्या बुद्धीने झालेला निर्णय तोच बरोबर आहे मग अनेक पक्ष होण्याचं कारण

काय? स्वराज्य मिळण्याच्या वेळी निरनिराळ्या पक्षांचं ऐक्य पाहिजे होतं ते तेवढ्यापुरतं झालं, स्वराज्य मिळालं. परंतु स्वराज्य मिळाल्यानंतर अनेक पक्ष होण्याचं कारण काय? अनेक पक्ष याचा अर्थ आमचीच बुद्धी चांगली आहे आणि ती चांगलीच बुद्धि आहे. संस्कृतमध्ये एक म्हण आहे त्याचा अर्थ असा कि माझ्याकडून झालेलं योग्यच आहे. माझंच बरोबर आहे. असे जर बुद्धीमध्ये दोष असले आणि ते दोष आपल्याला आढळून आले व ते जर दूर झाले नाहीत तर अशा सदोष बुद्धीकडून कार्य होणं शक्य नाही. वैयक्तिक नाही, सामाजिक नाही एवढंच काय पण राष्टीय कार्यही अशा बुद्धीने होणं शक्य नाही. म्हणून नेता कसा असावा, नेतृत्व कसं असावं हे दाखवण्याकरता वाल्मिकींनी रामाचं चरित्र पुढे ठेवलं आहे. रामायण त्या करता आहे. नेत्यांनी ज्ञान मिळवण्यासाठी पुष्कळ वाचन केलं पाहिजे. आंध्र प्रांतात आजही संस्कृतचा अभ्यास केलेले मंत्री आहेत. ते बोलायला उभे राहीले म्हणजे भाषणात मध्ये मध्ये शंकराचार्यांचे श्लोक सांगतात. आमच्याकडे नुसतं रामायण आणि महाभारत आहे म्हणायचं. त्यांचा अभ्यास कोण करतंय? नेतृत्व मिळायला या चांगल्या ग्रंथांचा अभ्यास व्हायला नको का? कशी बुद्धी पाहिजे, कशी युक्ति पाहिजे. ''जितेंद्रियम् बुद्धिमतां वरिष्ठम्'' असं मारूतीरायांना म्हणतात. बुद्धिमतां वरिष्ठम् झाले कसे? काय त्यांनी कसा अभ्यास केला असेल? हे आम्ही पहातच नाही. संस्कृत भाषा तर अगदी मागेच पडलीये. स्वराज्य मिळाल्यानंतर हा मोठा लाभ झालाय आमचा. स्वराज्यापूर्वी इंग्रजांच्या राज्यात इंग्रजीप्रमाणे संस्कृत भाषा आवश्यक ठरली होती. तिचा अभ्यास चालू होता, थोड्या प्रमाणात का होईना प्राचीन दृष्टीने

संस्कृतचा पुष्कळ अभ्यास आहे. शास्त्राचा अभ्यास आहे. वेदांचा अभ्यास आहे. तितकं जरी नसलं तरी वाङ्मय म्हणून का होईना थोडं फार संस्कृत राहिलं होतं. विद्यार्थ्यांची इच्छा असेल तर संस्कृत घ्या असं म्हटलं म्हणजे विद्यार्थ्यांच्या इच्छेप्रमाणे अभ्यासक्रम ठरवायचा. अभ्यासक्रम नेमण्याची सुद्धा काही इच्छा पाहिजे कि नको.

तर ह्या अशा आपल्या बुद्धीमध्ये असणारे दोष आपूयाला समजले पाहिजेत. आपल्या स्वत:च्या बुद्धीने समजणं शक्य नाही आणि दुसऱ्या कोणी दाखवले तर ते मान्य होत नाहीत. अहंकार वगैरे आड येतो.म्हणून शास्त्राचे संस्कार ज्या बुद्धीवर ती झालेले आहेत ती बुद्धी योग्य निर्णय घेऊ शकते. योग्य विचार करु शकते. वेदशास्त्र वगैरे जे वाङ्मय आहे ते ईश्वराने निर्माण केलेले आहे. ज्याला निर्माण होऊन पाच हजार वर्षे झाली कि दहा हजार वर्षे झाली कि लाख वर्षे झाली हा निर्णय अद्यापि आधुनिक बुद्धिवाद्यांना करता येत नाहीये. काशीमध्ये वेद म्हणणारे आणि रामेश्वरमध्ये वेद म्हणणारे अद्यापि जसेच्या तसे वेद म्हणतात. याचं पाश्चात्यांना सुद्धा आश्चर्य वाटतंय. ते जरी चंद्रलोकापर्यंत गेले असले तरी ही ज्ञानाची परंपरा भारतवर्षामध्ये इतकी हजारो वर्षे राहिली कशी याचा त्यांना देखील विस्मय वाटतोय. दहा–दहा हजार श्लोक कंठस्थ, पाठ करणारी मंडळी भारतामध्ये थोडी तरी आहेत. ऱ्हास होत चाललेला आहे.नुसतं टेप रेकॉर्ड करुन ही विद्या काय रहाणारी आहे काय. जिवंत ज्ञान बाळगलं पाहिजे. बुद्धिस्थ ही सगळी विद्या ठेवली पाहिजे. ही परंपरा कायम आहे आज भारतामध्ये. एक हजार वर्षांपूर्वी त्याच

मंत्रांनी प्राणप्रतिष्ठेच्या वेळी आवाहन करता आलं. हजार वर्षांनंतर या भारतामध्ये सोमनाथ पुन्हा आलेले आहेत. ईश्वराने निर्माण केलेल्या वेदविद्येचे संस्कार अद्यापि बुद्धीवरती थोड्या फार प्रमाणात का होईना पण आहेत.

हे सर्व विचारात घेऊन ते संस्कार आपल्याबुद्धीवर करा आणि आपल्या बुद्धिची सुधारणा करुन घ्या. आणि नंतर बुद्धिवाद वापरा तुम्ही. प्राचीन शास्त्रं तुम्ही बुद्धिवाद वापरु नका असं कधीही म्हणत नाहीत. त्यांना बुद्धिवाद मान्य नाही ही सगळ्या लोकांची गैरसमजूत आहे. बुद्धिवाद नंतर. आधी प्रमाण कोणतं आहे, प्रमेय कोणतं आहे ते समजून घ्या असं शास्त्र सांगतं. संत महात्म्यांची त्याकरता आवश्यकता आहे. शास्त्रावर किंवा संतांच्या शब्दावर विश्वास ठेवा एवढंच ते सांगतात. आणि तो विश्वास ठेवून त्यांच्यापासून जर मार्गदर्शन झालं--- आपल्या बुद्धीची सुधारणा कशी करायची, कोणचे त्याला उपाय आहेत, सुधारणा कितपत आहे, किती दोष आहेत, किती गुण आहेत हे समजून येतं, म्हणाले. आत्मनिरीक्षण करणारे ''उद्धरेत् आत्मानात्मानं''जरी भगवंतांनी सांगितलं असलं तरी तसे अधिकारी फार थोडे असतात. आपल्या आपण उद्धार करुन घेणं अशक्य आहे. म्हणून संत महात्म्याच्या शब्दावर विश्वास ठेवा. शास्त्रावर विश्वास ठेवा. आणि त्या शास्त्राच्या द्वाराने स्वत:च्या बुद्धीची सुधारणा करुन घ्या. नंतर ती बुद्धि उत्तम प्रकारे कार्य करु शकते. तशा प्रकारे आपल्या बुद्धीचा विकास होण्याकरता गायत्री मंत्राचा फार मोठा उपयोग आहे. साक्षात् ईश्वराची ही उपासना आहे. ही उपासना घडण्याकरता भारतवर्षामध्ये उपनयन संस्कार सांगितला आहे. सर्वांच्या बुद्धीला

प्रेरणा करणारी अशी कोणी तरी एक शक्ति आहे याची बालपणापासून त्यामुळे जाणीव होते.

**गायत्रीचे अनुष्ठान दीर्घ काल चालणारे असते. ह्याकालात प्रकृती बिघडू नये म्हणून आहार विहारावर नियंत्रण असावे लागते. आहाराची शुचिता ही बुद्धीवर संस्कार करण्याच्या दृष्टीने फार महत्वाची आणि आवश्यक आहे. आहार शुचितेची जबाबदारी स्त्रियांवर टाकलेली आहे म्हणजे पुरूषांवर नाही असा त्याचा अर्थ होत नाही. मनु म्हणतो जमाखर्च हा स्त्रियांनी ठेवावा. त्या गृहिणीला किती पैसे जमा होतात आणि किती खर्च होतात हे समजले पाहिजे. त्यानंतर शुचिता,पवित्रपणे रहाणे. आपणच पवित्र राहिले म्हणजे घरचे वातावरणच पवित्र रहाते. मन किंवा बुद्धि ही अन्नापासून तयार होत असते. प्रत्येकाचं मन हे पोटात गेलेल्या अन्नाच्या सात्विक अंशापासून तयार होत असते. त्या करता अन्न पवित्र पाहिजे. नैवेद्य दाखवून ते पवित्र करून मग ते सेवन करावे, असं मुद्दाम सांगितलेलं आहे. ज्यांना आपलं मन तयार करायचंय त्यांना त्याची जरूरी आहे. आपलेपणाने, प्रेमाने, शुचितेने बनवलेले अन्न मुले, पती,आप्तेष्ट इ. ना खायला मिळालं तर त्यांचं मन चांगलं बनतं आहे. म्हणजेच राष्ट्रातील मुलं, तरूण इतर पुरूष मंडळींची मनं तयार करण्याचे काम स्त्रियांवर सोपवलेलं आहे. घरात भांडीकुंडी किती आहेत, सोनेनाणे, कपडालत्ता किती आहे अशा सगळ्या गोष्टींकडे लक्ष द्यायची जबाबदारी स्त्रियांची आहे. अशा रीतीने हे सगळे स्त्रीधर्म शास्त्रकारांनी सांगितले आहेत. पण हे सगळे चुकीचे आहेत असं आम्ही आमच्या बुद्धीने सांगतो. पण**

**शास्त्राने असं कां सांगितलंय, त्याचा अभिप्राय काय आहे, त्या मागची भूमिका काय आहे,उद्देश काय आहे या सगळ्या गोष्टी जर समजून घेतल्या, बुद्धिला पटल्या व त्याप्रमाणे वर्तन झाले तर कितीतरी कल्याण होण्यासारखं आहे. परस्परांचा भेद वैरे काही निर्माण होणार नाही. हा भेद निर्माण केलेला आहे. भारत राष्ट्र हे परतंत्रच राहीलं पाहिजे असं त्याना वाटल्यामुळे त्यांनी हा सगळा बुद्धिभेद निर्माण केला. इंग्रजांनी स्त्री पुरूषांपासून अनेक प्रकारचे भेद निर्माण केले. ते अजूनही कायम आहेत.**

तर आपण आपलं शास्त्र काय आहे हे सगळं समजून घेऊन आपली बुद्धी चांगली तयार करायची आहे.

दुष्यंत राजा कण्व ऋषींच्या आश्रमात गेला. कण्व ऋषी कुठे बाहेर गेले होते. शकुंतला तिथे होती. शकुंतलेला पाहिल्याबरोबर त्याला मोह उत्पन्न झाला. त्याला वाटलं ही तर ऋषींची कन्या दिसते आणि माझं मन हिच्यावर गेलं हे बरोबर नाही. शेवटी त्याने असा विचार केला की ज्याअर्थी माझ्यासारख्या आर्याचे मन हिच्यावर गेलं त्याअर्थी ती ऋषींची ब्राह्मण कन्या नसून क्षत्रिय कन्या असली पाहिजे. त्याप्रमाणे त्याने तिला विचारल्यावर शकुंतला म्हणाली, ''हो, मी क्षत्रिय कन्या आहे.'' म्हणजे मनाने निर्णय करता येतो पण ते मन आर्य बनलं पाहिजे. संस्कृत बनलं पाहिजे. दोष सगळे निघून गेले पाहिजेत. तर त्या बुद्धीने केलेला निर्णय बरोबर ठरतो.

तर अशा रितीने बुद्धी वापरण्याकरता ती बुद्धी चांगली बनवावी. बुद्धीचा विकास करुन घ्यावा म्हणजे काहीही अशक्य नाही. दुरितक्षय झाला पाहिजे, बुद्धीतले सगळे दोष निघून गेले पाहिजेत. स्वधर्माचरण

घडलं पाहिजे. ज्ञानेश्वर महाराज त्याचं फल सांगतात. ....

''जो जे वांछिल तो ते लोहो प्राणिजात'' तर हा आपल्या बुद्धीचा विकास आपल्या राष्ट्राला अत्यंत आवश्यक आहे. भौतिक विकास चाललेला आहे. भौतिक विकासापेक्षा बौद्धिक विकासाला जास्ती महत्व आहे. बुद्धी चांगली राखण्यासाठी सबंध राज्य सोडून पांडव वनात निघून गेलेले आहेत. द्यूत आपण खेळलो हे चुकलं आपलं असं त्यांनी कबूल केलेलं आहे. भगवंतांनी सुद्धा अर्जुनाला मी सांगतो म्हणून ऐक असं कधी म्हटलं नाही. शास्त्र प्रमाण आहे. त्या शास्त्राज्ञेप्रमाणे काय तो विचार कर आणि निर्णय घे, म्हणाले. सत्संगती म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानेश्वर महाराज, एकनाथ महाराजांची संगती मिळण्याचं काही आपल्या भाग्यात नाहीय. आणि ते जर आज असते तर त्यांना कोणी विचारलं असतं कि नाही, कोणाला ठाऊक! ज्ञानेश्वर एक झाले की दोन झाले अशा प्रकारचे वादविवाद आमच्या बुद्धीने निर्माण होतात. परंतु त्यांच्या ग्रंथांची संगती म्हणजे त्यांचीच वैचारिक संगती आहे. त्यांचा अभिप्राय मांडणारे भगवद्भक्त आजही या जगामध्ये आहेत. आज भारतवर्षामध्ये त्यागी, अभ्यास करुन त्याप्रमाणे वागणारी मंडळी आहेत. पण आमची बुद्धी शुद्ध झाली पाहिजे असं आम्हाला वाटलं पाहिजे ना! जिज्ञासा निर्माण झाली पाहिजे. ही जिज्ञासाच संपली आहे भारत राष्ट्राची. एकदा अनुकूल परिस्थिती निर्माण झाली कि बाकीचा अभ्यास नाही, विचार नाही, काही नाही. चार्वाकवादाप्रमाणे पुण्य नाही, पाप नाही, ईश्वर नाही, काही नाही. म्हणून वाटेल ते वाटेल त्या वेळेला व वाटेल तितकं खाणार म्हणून चालेल का? नास्तिक जरी असला तरी त्याने शरीर प्रकृती चांगली

राहाण्याकरता नियमाने रहायला पाहिजे की नको?

योग्य आहार विहार असावा असंच शास्त्र सांगतय. शास्त्र हितैषी आहे. हिताचेच सांगतय. हित निराळं आणि प्रिय निराळं आहे आणि नुसतं प्रिय तेच करुन भागत नाही. हित हे त्याच्यापेक्षा वेगळं आहे. हित सांगणारी मंडळी फार थोडी भेटताहेत. ती जाणीव पाहिजे, जिज्ञासा पाहिजे. त्यांना आपलं हित कशात आहे हे विचारलं पाहिजे. नास्तिकालासुद्धा फक्त प्रियाचाच विचार करुन चालणार नाही.

हा सगळा विचार शास्त्राने मांडला आहे. संत महात्म्यांचे हेच सांगणं आहे. आपल्या भारतवर्षामध्ये बौद्धिक विकास अधिकाधिक होत जावा अशी त्यांची प्रार्थना आहे. तो बौद्धिक विकास ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदानामध्ये मांडलेला आहे. त्याप्रमाणे ईश्वराच्या कृपेने ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रार्थनेप्रमाणे भारतवर्षामध्ये तो बौद्धिक विकास होत आला आहे. त्याप्रमाणे ''सत्कर्म योगे वय घालवावे'' या समर्थांच्या उक्तीप्रमाणे सर्वांचा बौद्धिक विकास जास्तीत जास्त होऊन या गायत्री यज्ञासारखी पुण्यकर्म घडावीत अशी ज्ञानेश्वर महाराजांच्या चरणी प्रार्थना करुन ही वाङ्मय सेवा संपवतो

॥अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त॥

मुलुंड २८.११.८६

## देवीमहात्म्य – तुकारामबीज – बीड – १८.३.१९९५

**सर्व मंगलमांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके।**
**शरण्ये त्र्यंबकेगौरी नारायणी नमोऽस्तुते।**

आज तुकाराम बीज आहे. तुकाराम महाराजांची पुण्यतिथी आहे. तुकाराम महाराज होऊन बरीच वर्ष झाली. २००/३०० वर्ष झाली. तथापि त्यांनी जे अभंग केले त्या अभंगाच्या द्वाराने सर्व समाजाला मार्गदर्शन होण्याचे कार्य आजही चालू आहे. वारकरी सांप्रदायांमध्ये तुकारामांची गाथा म्हणजे अत्यंत श्रेष्ठ प्रमाण मानली आहे. सबंध गाथा पाठ म्हणणारे लोकही अजून आहेत. देव अवतार घेतात. त्याप्रमाणे दैत्यही जन्माला येतात. परंतु देवांची सात्विक वृत्ती वेगळी आणि दैत्यांची स्वार्थी वृत्ती वेगळी. आपलं कल्याण झालं पाहिजे. आपले जे काही परिवारी असतील, आपले जे काही अनुयायी असतील त्यांचं कल्याण व्हावं हा स्वार्थ आहे. त्यामुळे आणखी देवांना संरक्षण देण्याकरता ईश्वराचे अवतार हे वेळोवेळी होत आहेत.जगदंबेचे अवतार अनेक झालेले आहेत, होताहेत.

देवी माहात्म्यामध्ये आणखी दैत्यांचा वध करण्याकरताच भगवती जगदंबेचे अवतार झाल्याचे वर्णन केलेले आहे. मधुकैटभ दैत्य प्रथम निर्माण झाले. दैत्यांमध्ये सुद्धा प्रयत्नवाद आहे. प्रयत्नांनी तपश्चर्या करुन देवांपेक्षाही श्रेष्ठ व्हावं, देवांचा पराजय करावा आणि त्यांची स्थानं घ्यावीत ही वासना आहे. तपश्चर्याही दैत्य पुष्कळ मोठी करतात. मधुकैटभ दैत्य आरंभाला ब्रह्मदेवाचाच नाश करायला प्रवृत्त झालेले असताना ब्रह्मदेवांनी भगवतीची स्तुती केली. विष्णू आणि मधुकैटभ यांचं पुष्कळ वर्ष युद्ध झालं आणि विष्णूंकडून त्यांनी वर

घेतला की नाही नसेल त्या ठिकाणी विष्णुंनी त्यांचा नाश करायचा. त्याप्रमाणे युक्तीनं भगवान विष्णूंनी जगदंबेच्या प्रेरणे प्रमाणे त्या दैत्यांचा नाश केला.

त्यानंतर महिषासुराचं एक चरित्र लिहिलेलं आहे मार्कंडेय मुनींनी. हा ही असुर मोठा तपस्वी होता. तपश्चर्या करुन आणखी विजय मिळवायचा. कोणत्याही पुरूषापासून आपला नाश होऊ नये, असा त्याने वर मागितला होता. स्त्री आपला नाश करु शकणारच नाही याची त्याला खात्री होती. रावणाने वर मागताना देव, दैत्य, गंधर्व या कुणाकडूनही आपला विनाश होऊ नये असाच वर मागितला होता. मानव मला काय करणार आहे? अशा अहंकारामध्ये तो गेला आणि मानवामध्ये भगवंतांना अवतार धारण करावा लागला. त्या अवतारामध्ये रावणाचा वध झालेला आहे. सर्वही असुर मंडळींकडे संपत्ती आहे, सत्ता आहे, वर मिळवून आणखी देवांचंही राज्य घेतात. सैन्यबल पुष्कळ आहे. आणि त्या सैन्याच्या बळावर, संख्या बळावर आणि आपला कोणीही पराभव करणार नाही असा एक अहंकार त्यांना होता. देवांची स्थानं, स्वर्गादिक लोक त्यांनी घेतले.सगळ्या देवांना काढून टाकलं आणि एकटा तो महिषासुर सर्व देवांची कार्य करीत होता. हे मार्कंडेय ऋषींनी लिहिलेलं आहे. म्हणजे त्याची शक्तीही मोठी होती. सर्व देवांच्याकडे जी कार्य नेमून दिलेली आहेत ईश्वराच्या सृष्टीमध्ये, सूर्याचं काम निराळं, वरुणाचं काम निराळं, यमधर्माचं काम निराळं,सृष्टीची सगळी व्यवस्था लावायची आहे ईश्वरांना त्यामुळे अधिकारी अशा प्रकारचे मोठे मोठे देव आहेत त्याच्याकडे  विश्वाचं कार्य यांनी सोपवलेलं आहे. परंतु महिषासुर

ज्यावेळेस मोठा झाला, तपश्चर्येनं सर्व देवांची स्थानं त्याने घेतली, अधिकार त्यांचे घेतले. आणि त्यांच्या अधिकाराप्रमाणे सर्व कार्य केलं ही तक्रार सर्व देवांनी केली. आम्ही, म्हणाले, माणसासारखं इकडे तिकडे फिरतो. आम्हाला रहायला जागा नाही. अधिकार तर गेलाच आमचा हा महिषासुर उत्पन्न झाल्यापासून आमची ही दुर्दशा झालेली आहे.

त्यावेळी मग भगवान विष्णु, शंकर, ब्रह्मदेव, इंद्र, वायू सर्व देवांच्या शरीरातून दिव्य तेज बाहेर पडलं आणि त्या सर्व तेज़ांचं एकत्रीकरण होऊन आणखी महिषासुरमर्दिनीचं स्वरुप तयार झालं, अशी कथा त्यांनी लिहीलेली आहे.आपली जी काही आयुधं असतील ती आयुध देऊन, काही आपल्याजवळ अलंकार असले तर अलंकार देऊन सर्व देवांनी देवीची पूजा केली. मग असुरांना ही बातमी समजली. महिषासुर, त्याचे सगळे अनुयायी आजपर्यंत त्यांना अशी कल्पना नाहीये की आपल्याविरोधी कोणीतरी आहे. पण वेळ आली त्यांची. तरी सुद्धा अहंकार आहे. हे जे असुर जन्माला येतात हेही पूर्वीच्या त्यांच्या जन्मामध्ये काही तरी ईश्वराची उपासना करणारे असतात. सकाम का असेना पण उपासना आहे. आणि ती सकाम उपासना करुन त्यांनी सामर्थ्य मिळवलेलं आहे. त्यांचे एकेक एकेक सेनापती असे मोठे पराक्रमी होते की कोणच्याही युद्धामध्ये त्यांचा पराजय कधीही झालेला नव्हता. पण जगन्मातेबरोबर आता युद्ध करायचं आहे. ही कल्पना त्यांना नाहीये. ही ईश्वरी शक्ती आहे. आपण मानव आहोत ही कल्पनाच नाही. अभिमानामुळे आपल्यासारखा श्रेष्ठ पराक्रमी कोणीही नाही. त्यामुळे सर्वही विश्वातले देव काय, मानव

काय, सर्वांना अगदी तुच्छ समजत होते. पण युद्धाच्या वेळेला एकेक एकेक सेनापती मारला जाऊ लागला. मोठा सेनापती अगोदर मेला. दुसरा सेनापती त्यालाही त्या सिंहांनी मारलं. देवीनी काही मारले. मग प्रत्यक्ष महिषासुर हा युद्ध करण्याकरता आलेला आहे. पराक्रमी आहे मोठा. पण त्याचा पराक्रम ईश्वरी शक्तीपुढे काही चालू शकला नाही. पाशामध्ये त्याला बंधन केले आणि मग शेवटी त्याचा शिरच्छेद देवीनी केला. सर्व देवांचं राज्य देवांच्या ताब्यात दिलेलं आहे. वरप्रदान केले आणखी देवी अंतर्धान पावलेली आहे. परंतु हे संकट देवांच्या वरचं नेहमीचच आहे. देव दैत्यांचं युद्ध जे आहे ते सारखं चालू आहे.

**उपनिषदामध्ये, आपल्या मनामध्ये ज्या सद्वासना आहेत ते देव आहेत आणि दुर्वासना म्हणजे दैत्य आहेत, अशी कल्पना केलेली आहे. त्यांचं युद्ध चालूच आहे. कधी सद्वासना विजयी होतात कधी दुर्वासना विजयी होतात. दुर्वासनेप्रमाणे पापकर्म घडतात. सद् वासनेप्रमाणे पुण्यकर्म घडतात हे चालू आहे सारखं.**

त्याचप्रमाणे हे देव दैत्यांचं जय पराजय चालू आहे. महिषासुर गेला, जय मिळाला देवांना पण पुन्हा काही काळ गेल्यानंतर पुन्हा त्या दैत्यांपैकी शुंभ निशुंभ हे दैत्य निर्माण झाले. शास्त्रात सांगितल्याप्रमाणे आणखी तपश्चर्या करायची. शास्त्र मानायचं म्हणजे ईश्वर मानायचा तेवढ्यापुरता वर मिळाला. एकदा सामर्थ्य मिळाल्यावर मग मात्र ईश्वराला विसरुन जायचं अशी परिस्थिती त्या दैत्यांची आहे. तेही मोठे पराक्रमी बंधू. त्यांचाही नाश करण्याकरता भगवतीचा अवतार झाला. महासरस्वती, महाकाली, महालक्ष्मी, तीन प्रकारांनी देवाच्यावर संकटं आलेली होती. ती सर्व संकटं दूर करण्याकरता हे

तीन अवतार झालेले आहेत. आणि शुंभ निशुंभ त्याचे अनुयायी कितीतरी मोठे मोठे पराक्रमी दैत्य ते ही सगळेच तपस्वी. त्यांच्या अनुयायांपैकी रक्तबीज नावाचा जो दैत्य आहे त्याने असा वर मागितला की त्याला कुणी मारलं व त्याचं रक्त जमिनीवर सांडलं की नवीन रक्तबीज तयार होत असे. काय वर मागितला. काय चातुर्य बुद्धीचं त्यांनी दाखवलं. म्हणजे मरण नाहीच आहे. याला मारायचं कसं ? मग योजना केली दुसरं एक रुप चामुंडा तिला आज्ञा केली, महासरस्वतीनं. आणि त्या दैत्याचं रक्त भूमीवर काली पाडायचं नाही अशी योजना करुन त्याचा संहार केला. वर दिल्यानंतर त्याप्रमाणे वागलं पाहीजे. आपणच वर द्यायचा आणि आपणच त्याच्याविरुद्ध कसं वागायचं?

त्या देवीभागवतामध्ये एक कथा आहे. दुर्गम नावाचा एक दैत्य होता. त्याने भयंकर तपश्चर्या केली आणखी ब्रह्मदेव प्रसन्न झालेले आहेत. त्याने मागणं मागितलं, ''ऋषीमंडळी वेदाभ्यास करतात, अनुष्ठान करतात ते सगळे वेद त्यांच्याकडचे काढून मला द्या.'' म्हणजे ऋषींना काही स्मरण नाही. सगळं एकंदर वेदांचं सत्व आपल्या ताब्यामध्ये त्याने घेतलं आणि मग ऋषींना काही अनुष्ठान नाही काही नाही. स्मरणच नाही ना. त्यांची बुद्धीच दुर्गमाने ताब्यात घेतल्याप्रमाणे झालं. असा त्याने पुष्कळ अपमान केला. आणि त्या दुर्जनाचा नाश करुन ते संपूर्ण वेदज्ञान ऋषींना पुन्हा दिलं देवीनं जगदंबेनं. अशी कथा आहे.

तर या तीन कथा म्हणजे महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती तीन अवतारांमध्ये ब्रह्मदेवांच्यावर आलेलं संकट दूर केलं. महालक्ष्मी

अवतार धारण करुन महिषासुराचा नाश केला. महासरस्वती अवतार धारण करुन शुंभ निशुंभाचा नाश केला. देवी भागवतामध्ये आणखीही पुष्कळ कथा आहेत. देवीची उपासना आहे. कशी करायची, काय करायची, पुष्कळ सांगितलेलं आहे. अनेक अवतार झालेले आहेत. परंतु देवाचे भक्त किंवा देवीचे भक्त जे आहेत, संत महात्मे ज्यांना आपण म्हणतो, तुकाराम महाराजांसारखे, यांचं कार्य मात्र अखंड चाललेलं आहे. संकटाचे प्रसंग जरी आले तरी बुद्धी तयार करण्याचं कार्य संतांच्यकडं आहे.

'हेचि थोर भक्ती आवडते देवा । संकल्पावी माया संसाराची ।

मार्गदर्शन संतांचं बुद्धीनंच करायचं. संसाराची माया आसक्ती जी बुद्धीमध्ये आहे. घर,दार, दौलत, शेती, वाडी, धन वगैरे सत्ता हे सगळं आपण मिळवावं म्हणून जी काही आसक्ती मानमध्ये राहून प्रयत्न आपले चालू आहेत, पण **हीच माया, ही आसक्ती कमी करणं म्हणजे देवाची भक्ती आहे म्हणतात.** मनामध्ये अनेक वासना उत्पन्न होत आहेत. आणि त्या मनांत ठेवून आपण देवाची भक्ती करायची आणि देवाजवळ ते मागायचं त्याप्रमाणे ते विकार पुन्हा जास्ती वाढतात. त्यापेक्षा आपल्या मनाचा, इंद्रियांचा निग्रह करुन मनामध्ये असलेल्या वासना जर कमी करण्याचा प्रयत्न केला तर ते खरं **भक्तीचं फळ** असं मार्गदर्शन सत्पुरुषांचं आहे. बुद्धीमध्ये असणारे दोष दूर करण्याकडे त्यांचं लक्ष आहे.

सद्वासनेच्या योगाने दुर्वासना कमी करायच्या. सत्कर्म करायचं, तीर्थयात्रा आहे. दानधर्म आहे, यज्ञयागादिक आहे. हे कार्य जेवढं आपल्या हातून होईल तेवढं करावं, 'सत्कर्म योगे वय घालवावे'

समर्थ म्हणतात. **आयुष्य असेपर्यंत सत्कर्म करायचे काही थोडे दिवस सत्कर्म केली पुरे झालं आता. कोण आहे माझ्याइतका सत्कर्म करणार? असा अभिमान बाळगून उपयोग नाही. अभिमानाच्या योगानी आणखी ज्ञानाचा अभिमान उत्पन्न होऊन त्यांनी मुद्दाम इशारा दिला.**

ज्ञानराज सांगतात, मनामध्ये असणारा अहंकार हा मोठा दोष आहे. आणि हा अहंकार, अभिमान हा अज्ञानी माणसापेक्षा ज्ञानी माणसाला लवकर त्रास देतो. माझ्या सारखा कोण आहे. मला सगळं समजतं आहे. मी सर्वांना आणखी मार्ग दाखवणार आहे. तशी बुद्धी मला आहे. हा अभिमान धारण करुन रहाणारे जे ज्ञानी लोक आहेत त्यांची धारणा आहे.

शंकराचार्य महाराजांच्या चरित्रामध्ये तर आपल्याला पहायला मिळतं शंकराचार्य महाराज तर लहान वयामध्ये ८ व्या ९ व्या वर्षीच संन्यासदीक्षा घेऊन बाहेर पडले. आईची अनुज्ञा घेतली. एकुलते एक आईला. पूर्णांबा तिचे नांव. तिला विचारुन बाहेर पडले. संन्यास दीक्षा झालेली आहे. भगवत भक्तीपर रचना झाली. गीतेवर आणखी भाष्य लिहिलं. व्यास महर्षींनी केलेल्या वेदान्त सूत्रावर भाष्य, उपनिषदावर भाष्य लिहिले. खरा अर्थ काय आहे हे त्यांनी आपल्या ग्रंथ रुपाने मांडलेलं आहे. संस्कृत भाषेमध्ये ग्रंथ आहेत. संस्कृत भाषेचा अभ्यास कमी कमी झाल्यामुळे ते बाजूला आपण ठरवता.

त्यांचे पद्मपादाचार्य म्हणून पहिले शिष्य होते. आपण केलेले सगळेही भाष्य ग्रंथ त्यांनी पद्मपादाचार्यांना दिले. ब्रह्मचारी होते ते. ब्रह्मचर्यातून पद्मपादाचार्यांनी संन्यास घेतला. प्रत्यक्ष आचार्य

महाराजांच्या जवळ राहून अभ्यास करणं. गुरुभक्ती आहे. ईश्वरभक्ती आहे. हे केवढं भाग्य आहे. तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर महाराज, एकनाथ महाराज पुराण सांगत होते म्हणतात. एकनाथ महाराज भागवत सांगायचे. अनेक अभंग केलेले आहेत. एकनाथी भागवत तर त्यांचंच आहे. श्रीकृष्णांनी जाताना उद्धवजींना जो उपदेश केला. भागवताचा एकादश स्कंध आहे त्याच्यावर विवरण सगळं नाथ महाराजांनी लिहिलं. गीतेचा उपदेश अर्जुनाला केला. आणखी हा उपदेश सगळा उद्धवजींना केला. उद्धवजी मोठे अधिकारी भक्त होते. तुम्ही कुणाला हे योग्य वाटलं तर हे ज्ञान द्या, भगवान निजधामाला जाताना सांगून गेले. नाथ महाराजांचे ग्रंथ मराठीमध्ये आहेत. संस्कृतचा आपला अभ्यास नाही, काय करावं, असं वाटण्याची काही गरज नाही. गीता मूळ संस्कृतमध्ये आहे. पण ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी गीतेचा अर्थ म्हणून लिहिली आहे. भावार्थदीपिका त्याला म्हणतात. भावार्थ काय आहे गीतेचा हे स्पष्ट करुन सांगतात. मराठीमध्ये आहे. उपनिषदामध्ये इतरही ठिकाणी शास्त्रग्रंथामध्ये जे जे महत्वाचे सिद्धांत आहेत ते अभंगादिक रुपाने तुकाराम महाराज, नामदेव अशा मोठमोठ्या मंडळींनी अगदी मराठीमध्ये दाखवलं आहे. **तर हे सगळे सिद्धांत लक्ष्यामध्ये रहाण्याकरता बुद्धी निर्दोष झाली पाहिजे. त्या बुद्धीमध्ये असलेला अहंकार, अभिमान गेला पाहीजे.**

पद्मपादाचार्य मोठे ज्ञानी, प्रत्यक्ष आचार्य महाराजांची संगती त्यांना मिळालेली आहे. त्यांच्या मुखातून सगळं श्रवण केलेलं आहे. ज्ञान उत्तम झालेलं आहे. संशय काही नाही आहे. सकाळच्या वेळेला आचार्य महाराज सगळ्यांना समजून सांगायचे. उपनिषदे व्यासांची,

सूत्र काय, गीता काय, सर्वांना समजून सांगायचे. सगळी शिष्य मंडळी येऊन बसायची. श्रवण करायची. त्यांचा एक अज्ञानी शिष्य होता गिरी नावाचा. **अज्ञानी आहे पण गुरुमहराजांची सेवा करायची एवढं त्याला माहिती आहे. मान, अपमान, लहान काम, मोठ काम काही नाही. जे काम असेल ते करायचं आणि गुरुमहाराजांची सेवा करायची. छाट्या धुवायच्या, कमंडलू भरुन आणायचा.**

एके दिवशी नदीवरुन यायला त्या गिरीला वेळ लागलेला आहे. गुरुमहाराजांच्या छाट्या वगैरे सगळ्या धुऊन कमंडलू भरुन आणायला विलंब झाला. सगळी मंडळी पुस्तक उघडून बसलेली आहेत. कुणाची वाट पहात? आचार्य महाराज म्हणाले तो गिरी अजून यायचाय म्हणाले, आणखी वाट पाहूया पुढे ५ मिनीटं. पद्मपादाचार्य ते त्या ठिकाणी होते. त्यांना अभिमान झालेला आहे. त्यांनी भिंतीकडे तोंड केलं म्हणतात. भिंतीमध्ये आणि त्या गिरीमध्ये काय अंतर आहे. त्याची कसली वाट पहायची. तो येऊन तरी ऐकून काय करणार आहे? तो अजून यायचाय. पद्मपादाचार्यांसारखे अधिकारी मोठे नृसिंहाचे उपासक, ध्यानस्थ बसले म्हणजे नृसिंहरुप होत होते. सनंदन त्याचं नाव होतं मूळचं. दक्षिण प्रांतातलं. परंतु नदीच्या पलिकडे ते एके दिवशी पूर्वी असताना आचार्यांनी लवकर ये म्हणून हाक मारली. त्यांना काय नदीच्या पाण्याची भीती वाटली नाही. संसार समुद्रातून तारणारी आणखी गुरुभक्ती आहे. तेव्हां मला नदीत बुडण्याची भीती नाही. एकदम गुरुमहाराजांची हाक ऐकल्याबरोबर नदीतून चालत निघाले आणि त्या नदीत पाय ठेवल्याबरोबर त्या गंगा देवीनं त्याना पाय ठेवण्याकरता एकेक कमळ निर्माण केलं.

त्याचं लक्षही नाही. पाय पडला की मोठं कमळ आहे. एका कमळावरुन दुसऱ्या कमळावर असं करत करत आले. गुरुमहाराजांना नमस्कार केला. पद्मपादाचार्य त्यांचं नाव पडलं. पावलागणिक एक एक पद्म उत्पन्न झालं. इतकी गुरुभक्ती होती. नृसिंहाची उपासना तर अखंड चालू आहे. ध्यानस्थ बसलेलं असतांना नृसिंहरुप होतं. पण तो अहंकार आला मनामध्ये आणि त्या गिरीबद्दल तुच्छ आणखी बुद्धी दाखवल्याबरोबर पद्मपादाचा अहंकार दूर करण्याकरता आचार्य महाराजांनी त्या गिरीला चौदा विद्या लगेच मनानी देऊन टाकल्या. संकल्प. त्या गिरींचा काही संस्कृताचा अभ्यास नाही. काही माहित नाही. अज्ञान आहे. पण स्तोत्र करतच आले.

आचार्य महाराजांची प्रार्थना करतायत. जन्म मरणरुपी पाणी ज्याच्यामध्ये आहे त्या ह्या सुखदुःखात्मक संसारसमुद्रामध्ये मी पडलेलो आहे. माझा उद्धार आपणच करा. ही अनन्यभावाने प्रार्थना करणारे स्तोत्र म्हणतच आलेले आहेत. आश्चर्यचकित झाले. पद्मपादाचार्य. याला संस्कृत भाषेचा काही गंध नाही म्हणाले. हा स्तोत्र करतो. आचार्यांची स्तुती करतो आहे. आणि सगळे सिद्धांत याच्यामध्ये आहेत. त्रोटक वृत्तामध्ये स्तुती केल्यामुळे त्रोटकाचार्य त्याचं नाव पडलं. चार शिष्यांपैकी प्रसिद्ध गिरी आहेत. तर गुरुमहाराजांच्या सान्निध्यात राहूनही काही काळ ज्ञानाचा गर्व झालेला असतो म्हणून त्या ज्ञानाचा गर्व दूर करण्याकरता आचार्यांनी त्या गिरीला आपल्या संकल्प शक्तीनं सर्व विद्या देऊन टाकली.

आचार्य महाराजांनी एका सुभाषितामध्ये सांगितलं आहे, 'ज्ञान देण्याच्या वेळेला वाणी ही प्रिय पाहिजे, नम्र पाहिजे तर ते ज्ञान

अत्यंत श्रेष्ठ आहे. ज्ञान हे अगर्व पाहीजे. ज्ञानाच्या वेळेला गर्व उपयोग नाही. आणि शौर्य जर असेल तर क्षमाही पाहिजे आणि द्रव्य जर असेल तर त्याग पाहिजे.' एका पेक्षा एक दुर्लभ आहे असे म्हणतात.संतमहात्मे आणि ज्ञानी, असे दोघच असे वागू शकतात.

**तर गृहस्थाश्रमी पुरुषाला पुष्कळ शिकायचं असतं, संसार व्यवहारमध्ये द्वैतात राहूनच आपल्याला अद्वैतामध्ये जायचंय. अज्ञानामध्ये राहून आणखी ज्ञानी व्हायचंय. सर्वज्ञ परमेश्वराच्या स्वरुपापर्यंत जायचंय. जगन्माता देवीचं स्वरुपही आपल्याला कळून आलं पाहिजे.** चैतन्यरुप आहे. देवीच्या स्वरुपाचं वर्णन करीत असताना ......

या देवी सर्वभूतेषु मातृरुपेण संस्थिता: ।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नम: ।

माता याचा अर्थ आई हा एक अर्थ आहे. पण माता म्हणजे परमात्मा जीव असाही अर्थ काहीकाही करतात. सर्व जीवरुपानी ही जगन्माता आहे ही भावना आहे. सृष्टी निर्माण केली जगदंबेनं. सृष्टीरुप तीच झालेली आहे. सिद्धांत वेदान्त शास्त्राचा ध्यास आहे. निर्माण करणारा ही त्याच्यापेक्षा वेगळा असू शकतो. हा महत्वाचा सिद्धांत वेदान्तशास्त्राचा. 'अभिन्न निमित्तोपादान' तोच निमित्त आहे. आणि तोच उपादानही आहे. जग निर्माणही करतो. म्हणजे सर्वज्ञही आहे. सवशक्तीसंपन्न इतकंच नव्हे जगद्रुप झालेला आहे तो. आता ह्याच्यापेक्षा काय मागायचं? निर्माण करणारा त्या वस्तूचं रुप होऊ शकत नाही. व्यवहारमध्ये असं कुणी नाहीये पणईश्वराची शक्ती अशी आहे की निर्माण करणारी ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती ती तर आहेच निमित्त

कारण म्हणून. इतकंच नव्हे तर स्वत:च जगद्रुप झालेला आहे. हा एक मोठा अभ्यास आहे. स्त्री, पुरुष, लहान, मोठे, सगळेही जीव म्हणजे जगदंबा आहे ही भावना जर मनामध्ये दृढ झाली तर मोठी भक्ती आहे.

त्यानंतर दुसरं स्वरुप म्हणजे अंतर्यामी आहे. 'सर्व इंद्रियांचा निग्रह करणारी, इंद्रियांवर ताबा ठेवणारी अशी आहे. सर्व भूतामध्ये व्यापून रहाणारी, अंतर्यामी म्हणून जिला म्हणतात ते एक स्वरुप आहे. पृथ्वी, जल, तेज, वायू, आकाश हे पंचमहाभूत जीवात्मे आहेत.हे केवळ जड दृष्टीनं, भौतिक दृष्टीनं आणखी आपलं शास्त्र ऋषीमुनी पहात नाही आहेत. पृथ्वी, जल, तेज, वायू, आकाश हे बाहेरुन त्यांचं रुप आहे. जसं आमचं शरीर आहे. पण शरीरात राहणारा जीवात्मा एक वेगळा आहे. सगळी इंद्रियं त्याच्या ताब्यामध्ये आहेत. त्या प्रमाणे पंचमहाभूतांच्या ज्या देवता आहेत त्यांच्यातसुद्धा अंतर्यामी अशी एक भगवती शक्ती आहे. सर्व रुपांचं स्वरुप धारण केलं. परमात्मरुपही ती आहे. त्या सर्वही जीवांचा अंतर्यामी निग्रह करणारी सर्वांना प्रेरणा करणारी ती शक्तीही आणखी जगदंबा आहे. आणि शेवटी सांगताना

'नमतस्यै नमतस्यै नमतस्यै नमो नम: ।

चैतन्य रुपानी सर्व ठिकाणी व्यापून राहीलेली आहे. सर्व ठिकाणी ब्रह्मचैतन्य, आत्मचैतन्य सगळीकडे आहे. स्त्री पुरुष हा भेद नाही आहे. आत्मवस्तूमध्ये स्त्री पुरुष भेद नाही आहे. एक देवीमहात्म्य वाचणारे भक्त मोठे होते. वाचताना 'नमस्तस्मै नमस्तस्मै नमस्तस्मै नमो नम:। म्हणत होते. एक संस्कृत शिकलेले पंडीत होते तिथं 'अरे

हे काय अशुद्ध म्हणतात. ती देवी स्त्री आहे आणि नमस्तमै काय म्हणतोस तू? तू चुकलायस, तो म्हणाला माझ्या तोंडात बसलं आहे ते. त्या पंडिताला रात्री दृष्टांत झाला. तुला ही सुधारणा करायला कोणी सांगितलं? नमस्तस्मै म्हटलं म्हणून काय बिघडलं? काय माझ्यामध्ये स्त्री पुरुष असा भेद आहे का? आत्मरुपानी चैतन्य रुपानी मी एकच आहे. आत्मा हा पुल्लींगी आहे, स्त्रीलिंगी आहे. आत्म्यामध्ये भेद कसला आहे म्हणाली? असली सुधारणा? तो म्हणतो ते मला प्रिय आहे. म्हणून सांगितलं देवीने.

तर अशा दृष्टीनं सर्व एकंदर जीवरुपानी, जीवाच्या अंतर्यामी रुपानी आणि सर्व चैतन्यरुप आलेलं आहे. अशी ही आणखी भगवती या भगवतीची उपासना ही अत्यंत पुण्याशिवाय होत नाही. **द्वैतभावना मनामध्ये असताना त्या द्वैतभावनेमुळे आणि नाना प्रकारचे विकल्प मनामध्ये उत्पन्न होतात. त्या सर्व चरित्रावरती आणखी निष्ठा उत्पन्न होणं, श्रद्धा उत्पन्न होणं आणि श्रद्धेनं त्याप्रमाणे सर्व चरित्र श्रवण करणं, त्याचं चिंतन करणं अखंड ध्यान, तन्मय होणं, हे फार मोठं कठीण आहे. म्हणून जगन्मातेची उपासना ही ज्या ज्या ठिकाणी चालू आहे त्या ठिकाणी देवीची कृपा आहे, प्रसाद आहे असं समजायला हरकत नाही.** बुद्धीदात्री आहे. आणि बुद्धीरुपही आहे. नुसती बुद्धी देणारी नाही. तर बुद्धी स्वरुप जीवन आहे. केवळ बुद्धीस्वरुप म्हणून आल्यानंतर देवीच्या स्वरुपानी जर आपल्याजवळ असलेली बुद्धी गेली तर स्वरुप आपल्याजवळ आहे. अशी जर भावना झाली तर तिच्यामध्ये दोष रहातील कसे? भावनेमुळे सगळं आहे. तेव्हां जगन्मातेबद्दल, जगदीश्वराबद्दल जशी जशी श्रद्धा भावना ही

अखंड राहील असा प्रयत्न सर्व साधुसंतांनी केलेला आहे. त्यांनी स्वत:च्या मुलाबाळांकडं लक्ष दिलं नाही. तुकाराम महाराज, नामदेव, एकनाथ महाराज सगळे संसारीच होते. पण संसारात राहून अनासक्त कसं राहता येतं ते त्यांनी दाखवलेलं आहे. संसार सर्वही जगदीश्वर आहे. परमेश्वरीचं स्वरुप आहे त्याचा मुख्य मालक मी आहे असं म्हणण्याचा अधिकार आम्हाला काय आहे? आम्ही काय निर्माण केलं. स्वत:चं शरीर कसं निर्माण झालं याचाही आपल्याला पत्ता नाहीये. शरीरामध्ये इंद्रिय किती आलेली आहेत? वाणी कशी आपल्याला मिळालेली आहे? आपल्या मनांतले अभिप्राय सांगण्याकरता वाणी आहे. मन, बुद्धी ज्याला म्हणतात ती सर्वही एकंदर मोठी शक्ती आहे. ही कोणी तयार केली? कोणत्या कारखान्यात ही तयार करता येईल? असं असताना सुद्धा मी आहे, माझ्या मालकीचा देहसुद्धा नाही. देह कसा तयार झाला हे आपल्याला माहीत नाही. अचिंत्य आहे. तेव्हा ईश्वरशक्तीचा संबंध आपल्या चित्तामध्ये अखंड राहिला पाहिजे.हेच संतांना सांगायचंय.

ठेविले अनंते तैसेचि रहावे । चित्ती असो द्यावे समाधान ॥

तुकाराम महाराज म्हणतात तशी आपल्या मनाची भावना तयार करुन ते सांगतात. **सुखदु:ख जे आपल्याला मिळतं ते आपल्या कर्माचं फल आहे हा महत्वाचा सिद्धांत त्यांनी मांडला.**

**वाहील्या उद्वेग दु:खची केवळ ।**
**भोगणे ते फळ संचिताचे ॥**

**तर हे जे आपलं कर्म आहे त्या आपल्या कर्माचा विचार क्रियमाण कर्म आहे. आपण जन्माला आल्यापासून पुष्कळ कर्म**

**आपल्या हातून झाली. चांगली झाली, वाईट झाली पण तिकडे आपलं लक्ष कुठे आहे? शास्त्र म्हणजे ईश्वराची आज्ञा आहे. ईश्वराने शास्त्र निर्माण करुन मार्गदर्शन करुन ठेवलेलं आहे. त्याप्रमाणे आपण वागलं पाहिजे अशी जर बुद्धी ईश्वराच्या कृपेनं आपल्याला मिळाली तर त्याप्रमाणे वागणं होईल, पुण्य होईल, सुख मिळेल. शास्त्राच्या विरुद्ध वागण्याची बुद्धी जर उत्पन्न झाली तर पापकर्म होईल आणि दु:ख भोगावं लागेल.** हा युक्तीवाद आहे सर्व शास्त्रज्ञांचा. पुण्य, सुख आणि पाप, दु:ख. त्याप्रमाणे शास्त्र आणि ज्ञान ज्यांनी मिळवलेलं आहे आणि त्याप्रमाणे वागणारे संत आहेत. हे ज्ञानी महात्मे आंहेत, यांची संगती आणखी आपल्यांला मिळाली पाहीजे. हे महत्वाचं आहे. चांगला गुण आणि वाईट गुण हे आपल्या बुद्धीनं आपण ठरवू शकत नाही. म्हणून चांगली संगती मिळावी हे सुद्धा देवालाच मागावं लागतं. देवाजवळ मागावं लागतं. संत संगती याचना. हे मुद्दाम तुकाराम महाराजांनी संतसंगाची याचना केलेली आहे. आमच्या मनाला जो आज चांगला वाटतो तो उद्याला वाईट ठरतो. काहीतरी त्याचं विपरित आचरण बघून अशी परिस्थिती आणखी झालेली दिसते. आपल्याला व्यवहारामध्ये असा अनुभव येतो. आपल्या बुद्धीनं याचा निर्णय आपण करु शकत नाही. हा चांगला आहे, हा वाईट आहे. म्हणून चांगली संगती ही देवाजवळ मागितली पाहीजे. असं तुकाराम महाराजांनी सांगितलं आहे. **ती संगती घडल्यानंतर त्या संगतीचा चांगला उपयोग होण्याकरता आणखी मनामध्ये असणारी संसाराची आसक्ती कमी झाली म्हणजे खरीभक्ती आपल्याला मिळाली. वैराग्य त्याला म्हणतात. व्यवहारातली आसक्ती कमी झाल्याशिवाय**

**संतांची संगती लाभूनही त्याचा उपयोग होत नाही. दुर्योधनाच्या बुद्धीवर काय परिणाम झाला?**

श्रीकृष्णांनी शिष्टाई करताना दुर्योधनाला सांगितले ''तुम्ही दोघेही कौरव पांडव एकच रहा मी पांडवांना समजून सांगतो. सगळं ते विसरुन जातील तू जरी त्यांचा अपमान केलेला आहेस पुष्कळ त्यांच्यावर अन्याय केलेला आहे तरी पण माझ्या सांगण्याप्रमाणे ते ऐकतील. तुम्ही एक व्हा. संहार नको'' पण त्याने ऐकले नाही.

इकडे रामराज्याच्या वेळेला भरताने सांगितले, ''हे तुमचे राज्य आहे तुम्ही सांभाळा. तुम्हाला नेण्याकरता अयोध्येच्या लोकांना घेऊन मी आलेलो आहे.त्यांच्या समक्ष हे तुमचे राज्य तुम्ही घ्या.'' राम जर परत आले असते भरताच्या सांगण्याप्रमाणे तर रावण जिवंत राहिला असता. हे मोठं काम आहे. त्या करता अवतार झालेला आहे. त्या करता काय काय संकटे येतील ती येऊ दे. आणि मातेची व पित्याची आज्ञा आहे. पण पित्याला रामाला चौदा वर्षे वनवासात पाठवावे लागले. ह्या सगळ्या पुढच्या घटना आहेत. शेवटी रावणाचा नाश व्हायचा तो झाला.

आईने केलेली व पित्याने मान्य केलेली आज्ञा पाळायला पाहिजे म्हणून रामचंद्रानी भरताला सांगितले, 'मी काही तुझ्याबरोबर येऊ शकणार नाही. तुझ्या आईची इच्छा तू  राज्य करावं अशी आहे. पित्याचीही तशीच आज्ञा तुला आहे. मला चौदा वर्षे वनवासात जायची आज्ञा आहे. आपण दोघांनीही आज्ञा पालन केले पाहिजे. तुला वनांत येता येणार नाही. तुलाच राज्याचा सांभाळ करावा लागेल. आणि मला राज्यात येता येणार नाही. पहा. विचार कर.

परंतु भरताची भावना रामचंद्र साक्षात् ईश्वर आहेत. राज्याचे खरे अधिकारी ते आहेत. पण मध्येच ही घटना घडली. ती आई अशी निघाली. तिला वर दिल्यामुळे राजालाही काही बोलता आले नाही आणि रामचंद्रांच्या नशिबी शेवटी वनवास आला.शेवटी भरत तयार झाला रामांची आज्ञा पालन करायला. ही त्याच्यावर जगदंबेची कृपा आहे. तिने त्याला तशी बुद्धी दिली. त्याने रामांच्याकडून त्यांच्या पादुका मागून घेतल्या. द्याव्या लागल्या त्यांना. त्या शिवाय तो भरत काही परत गेला नसता.

ही अडचण आहे. भरताला तर राज्यामध्ये पाठवायचं आहे,आपण वनांत जायचं आहे. ''संकल्पावी माया संसाराची'' हे शिकवण्याकरता हे सगळे आहे. त्यांना स्वत: राज्य गेल्याचे दु:ख काहीच नाही. अनासक्त कसं राहाता येतं वनांत हे त्यांनी आपल्या चरित्राने दाखवून दिले. वसिष्ठांनी सुद्धा त्यांची तारीफ केली. ''लवकर रामांना बोलवा. राज्याभिषेकाचा मुहूर्त आणखी जवळ आलेला आहे.'' असा एक निरोप आला. चला म्हणाले. मनावर काही परिणाम नाही. दुसरा निरोप आला, कैकेयीच्या सांगण्याप्रमाणे पित्याने वनवासात जायला सांगितले आहे. तरी मनावर काही परिणाम नाही. संकल्पावी माया संसाराची. याचे उदाहरण आहे. वनामध्ये जायची आज्ञा झाली तरी मनाला काही उद्वेग नाही. राज्याभिषेकाला बोलावल्याचा आनंद नाही. काय होईल ते होईल.

ठेविले अनंते तैसेचि राहावे ।
चित्ती असू द्यावे समाधान ॥

सुखाची वेळ असते तशीच दु:खाचीही असते. भगवंतांनीही उद्धवजींना

हेच सांगितले. 'सर्व ही योगो मनसः समाधी'

त्या रामांच्या पादुका घेऊन भरत अयोध्येत आलेला आहे. निघताना रामांना सांगितलं आहे, पंधराव्या वर्षाच्या पहिल्या दिवसाचा सूर्योदय भरत पहाणार नाही. तुम्हाला सूर्योदयापूर्वी तिथे आले पाहिजे. सिंहासनावरती त्यांच्या पादुकांची स्थापना केली आहे. आणि रामांचे राज्य आहे ह्या भावनेने चौदा वर्ष राज्य केले आहे. **ही इतकी ईश्वरप्रीती मनामध्ये उत्पन्न झाल्याशिवाय संकल्पावी माया संसाराची होत नाही फार कठीण आहे. ईश्वरावर इतकं प्रेम उत्पन्न झालं तर संसारात लक्ष कसं राहील? आपोआपच कमी होईल. हे सर्वही शिक्षण घेण्याकरता देवाजवळ संतांची संगती मागावी लागते. आपल्या प्रयत्नांनी ते होऊ शकत नाही.**

तेव्हा भरतानेही राज्य केले, दुर्योधनानेही केले परंतु दोघांच्याही राज्य करण्यामध्ये किती अंतर आहे? एकाने संहार केला आणि एक संरक्षण करुन राज्य देऊन टाकून मोकळा झाला. अशी चरित्र आपल्यासमोर आहेत. त्यांचे चिंतन करुन आपलं वागणं आपण कसं वागायचे हे ठरवले पाहीजे. आपण ईश्वराकडे काय मागावे हे संतानी सांगून ठेवले आहे. आपली बुद्धी निर्दोष व्हावी, शक्ती वाढावी, आपल्याला सत्संगती मिळावी म्हणून जगदंबेची प्रार्थना करायची आहे.

या ठिकाणी मागच्या वर्षीही आम्ही आलो होतो. या ठिकाणी येण्याचा याही वर्षी प्रसंग आलेला आहे. आपले डॉक्टरसाहेब, त्यांच्या सहधर्मचारिणी मातापिता वगैरे सगळ्यांचीच प्रवृत्ती सत्कर्माकडे आहे. पूर्व सुकृतामुळे त्यांना अगोदर सत्संगतीचा लाभ झाला. त्यांच्या

बुद्धीमध्ये आणखी सद्वासना निर्माण झाली. आणि जगदंबेची काहीतरी सेवा घडावी अशी तळमळ आहे त्यांना. त्यामुळे किती खर्च होतोय याचा हिशोब नाहीये. जमाखर्च केव्हां? जेव्हां हे द्रव्य माझं आहे अशी बुद्धी असेल तेव्हा. तशी बुद्धी असली म्हणजे शिल्लक किती राहाते, खर्च कमी करता येईल का इकडे लक्ष असते. धन हे साधन आहे साध्य नाहीये ही भावना ईश्वर भक्तीने निर्माण होते. संसार ईश्वराचा आहे माझा नाहीये. जगदंबाच सर्व संसाररुप झालेली आहे. अंतर्यामी रुप आहे. ही भावना असल्यानंतर ''योगक्षेम वहाम्यहम्'' हे भगवंतांनी अर्जुनाला सांगूनच ठेवले आहे.''भक्ताची काळजी मी घेतो.''

याप्रमाणे आणखी ईश्वर भक्ती तुकाराम महाराजांनी केली. त्यांना इतकी वर्ष होऊनसुद्धा त्यांच्या वैचारिक संगतीच्या योगाने त्यांचे मार्गदर्शन त्यांच्या अभंगांचे आलोचन करणाऱ्या लोकांना अद्यापि मिळत आहे. तुकाराम महाराज आजही आहेत. प्रत्येक वर्षी हा तुकाराम बीजेचा उत्सव देहूमध्ये वगैरे सर्व ठिकाणी साजरा होतो. आजही तिथे मोठा उत्सव चालू झाला असेल. या ठिकाणी त्यांचे स्मरण झाले आपल्याला आणखी त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे यथामती काही विचार करता आला. जगदंबेचे स्वरुप कसे आहे हे आपल्या लक्षात आले. तिच्याच कृपेने आपली बुद्धी निर्दोष व्हावी, शक्ती वाढावी, आपल्याला सत्संगती मिळावी, आपल्या ठिकाणी असलेले अहंकारदिक दोष दूर व्हावेत म्हणून जगदंबेची प्रार्थना करुन आजचे प्रवचन संपवतो.

**जगदंबा माता की जय ।**